पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी



भारतात पहिली 'हायड्रोजन रेल्वे' सुरू!

मुंबई • वर्ष: 8 • अंक: 14 • 16 जुलै 2026 • पृष्ठसंख्या: 36 • किंमत: 5 रू.




# धन्यवाद देवाभाऊ



## अध्यक्षीय मनोगत

# धन्यवाद देवाभाऊ

राज्य सरकारने अलीकडेच राज्यातील शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयापर्यंतचे कर्ज माफ करणारी कर्जमुक्ती योजना नुकतीच जाहीर केली. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानण्यासाठी प्रदेश किसान मोर्चातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. किसान मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांनी या कार्यक्रमाचे अतिशय उत्तमपणे संयोजन केले होते. याबद्दल श्री. वेताळ आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच संपलेल्या विधीमंडळ अधिवेशनात शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती. या योजनेतील काही अटी वगळण्याची मागणी शेतकऱ्यांतर्फे करण्यात आल्याने मुख्यमंत्री फडणवीस यांनी योजनेचे निकष बदलत दोन लाखापर्यंतचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला. २०१७ मध्ये मुख्यमंत्रीपदी असताना देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना जाहीर करून शेतकऱ्यांना कर्जमुक्ती दिली होती. देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात राज्य सरकारच्या शेतकरी हिताच्या निर्णयाबद्दलची माहिती अनेक वक्त्यांनी दिली. या अंकामध्ये कर्जमुक्ती योजनेतील तरतुदींची विस्ताराने माहिती देण्यात आली आहे. कर्जमुक्तीच्या या निर्णयाचा अभ्यास करून त्याची माहिती संपूर्ण राज्यात पोहचवण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने मेहनत घेतली पाहिजे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने २०१९ मध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपये देण्याची योजना सुरू केली. राज्य सरकारनेही शेतकऱ्यांना दरमहा ५०० रुपये प्रमाणे दरवर्षी ६ हजार रुपये देण्याची योजना सुरू केली आहे. त्यामुळे आता राज्यातील शेतकऱ्यांना दरवर्षी १२ हजार रुपयांचे अर्थसहाय्य मिळत आहे. देवेंद्रजींनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या पहिल्या कारकीर्दीत शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी 'जलयुक्त शिवार'सारखी अनोखी योजना सुरू केली. राज्यातील २० हजार पेक्षा अधिक गावांमध्ये ही योजना कार्यान्वित झाली आहे. त्याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदाही होत आहे. त्याबरोबरच देवेंद्रजींनी शेतकऱ्यांसाठी 'मागेल त्याला शेततळे' ही योजना सुरू केल्यामुळे लाखो शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळू लागला आहे. देवाभाऊंनी शेतकऱ्यांना मदत करताना कधीच हात आखडता घेतलेला नाही. किसान मोर्चाच्या कृतज्ञता सोहळ्यामध्ये देवेंद्रजींनी शेतकऱ्यांचे ७.५ एचपी पर्यंतचे ४८ हजार कोटींचे थकित वीज बिल करण्याचा निर्णय जाहीर केला. देवेंद्रजींच्या नेतृत्वाखाली सरकारने शेतकऱ्यांसाठी सौर कृषी वाहिनी आणि सौर कृषि पंप या दोन योजना सुरू केल्या आहेत. राज्यातील ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा केला जात आहे. यावर्षीच्या अखेरपर्यंत राज्यातील सर्व शेतकऱ्यांना दररोज दिवसा १२ तास मोफत वीज उपलब्ध करून देण्याचा निर्णयही श्री. फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने घेतला आहे. त्याचबरोबर नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी व्यापक योजना राबवण्याचा निर्णय फडणवीस सरकारने घेतला आहे. २२ जुलै रोजी देवेंद्रजींचा वाढदिवस आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या राजकीय कारकीर्दीचा आणि त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या निर्णयांचा आढावा घेणारे लेख या अंकात प्रसिद्ध करण्यात आले आहेत. देवेंद्रजींच्या रूपाने राज्याला विकासाच्या नव्या उंचीवर नेणारा भाग्यविधाता मिळाला आहे. अशा नेत्याच्या मार्गदर्शनाखाली आम्हा सर्वांना काम करण्याची संधी मिळत आहे. राज्याच्या प्रगतीसाठी देवेंद्रजी मेहनत घेत आहेत, त्याला संघटना म्हणून सहाय्य करण्याची जबाबदारी तुम्ही–आम्ही सर्व मिळून पार पाडू, असा शब्द या निमित्ताने देतो.

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग





संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे



प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां च हिते हितम् ..... ०४





चक्रव्यूह भेदणारा आधुनिक अभिमन्यू ..... ०७







भाग्यविधाता... ..... ०९





कर्जमुक्तीबद्दल 'देवाभाऊं'चा सत्कार ..... १८





प्रदेशाध्यक्ष श्री. चव्हाण यांचा वारक-यांशी संवाद ..... २१





भारतात पहिली 'हायड्रोजन रेल्वे' सुरू! ..... ३२


हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां च हिते हितम्




● **रविंद्र चव्हाण,** प्रदेश अध्यक्ष

> आचार्य चाणक्यांनी आदर्श राजाची कर्तव्ये ''प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां च हिते हितम'' (प्रजेच्या सुखातच राजाचे हित असते, प्रजेसाठी जे प्रिय आणि कल्याणकारी आहे, तेच राजाचे खरे हित असते) अशा शब्दांत वर्णन केली आहेत. चाणक्यांनी सांगितलेली ही लक्षणे देवेंद्रजींच्या कार्यशैलीची अंगभूत वैशिष्ट्ये आहेत.

**२०१४** ते २०१९, २४ ते २६ या ७ वर्षांतील त्यांची मुख्यमंत्रीपदाची कारकीर्द आणि त्या दरम्यान उपमुख्यमंत्रीपदाची अडीच वर्षांची कारकीर्द पाहिली की त्यांच्यातील आदर्श राज्यकर्त्याचा अनेकदा प्रत्यय येतो. देवेंद्रजींनी मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यापासून राज्याच्या विकासासाठी घेतलेल्या निर्णयांची प्रचंड व्याप्ती पाहिल्यावर थक्क व्हायला होते. महाराष्ट्रात पायाभूत सुविधांची क्रांती केल्यामुळे त्यांना इन्फ्रामॅन म्हणून गौरविले जात असले तरी केवळ त्याच क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष केंद्रीत न करता कृषी, उद्योग या क्षेत्रांच्या मूलभूत विकासासाठी देवेंद्रजींनी अनेक निर्णय घेत राज्याची अर्थव्यवस्था ३ ट्रिलियन डॉलर्स करण्याकडे निर्णायक पाऊल टाकले आहे. मुंबई-पुणे-नागपूर मेट्रो, समृद्धी महामार्ग, अटल सेतू, कनेक्टिंग लिंक या प्रकल्पांनी महाराष्ट्राचा चेहरा-मोहरा पार बदलून टाकला आहे. शेतीसाठी शाश्वत सिंचनाचे जलयुक्त शिवार, वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड प्रकल्प,

नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी महाकर्ज मुक्ती योजना यातून देवेंद्रजींनी बळीराजाच्या विकासाकडेही प्राधान्याने लक्ष दिले आहे. त्यांच्या कार्यकाळात सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती एका लेखात पूर्ण होऊ शकत नाही. राज्यकर्ता म्हणून महाराष्ट्राच्या विकासाला नव्या उंचीवर नेऊन ठेवणाऱ्या देवेंद्रजींना राज्यकारभार करताना अनेक राजकीय संकटांना तोंड द्यावे लागले. या सर्व राजकीय संकटांना पुरून उरणाऱ्या देवेंद्रजींच्या व्यक्तिमत्वातील योद्धा गेल्या १२ वर्षात ठसठशीतपणे समोर आला आहे. त्यांच्या सारखा संघर्ष आजवर कोणत्याच मुख्यमंत्र्याला, नेत्याला करावा लागलेला नाही, हे वास्तव आहे. एकीकडे राजकीय संकटांना तोंड देत असताना अत्यंत स्थितप्रज्ञतेने देवेंद्रजींनी राज्याच्या चौफेर विकासाचा आराखडा २०१४ ते २०१९ या काळात तयार केला आणि तो प्रत्यक्षातही आणला. राजकीय संकटांमुळे गांगरून न जाता त्यांनी केलेला राज्यकारभार त्यांच्या व्यक्तिमत्वाची उंची आणखीन वाढवणारा ठरला आहे.

मुख्यमंत्री असताना आणि विरोधी पक्षनेते असतानाही देवेंद्रजींना कोंडीत पकडण्याचे अनेक प्रयत्न विरोधकांनी केले. हे सर्व प्रयत्न देवेंद्रजींनी मोठ्या कौशल्याने हाणून पाडले. २०२२ मध्ये मविआ सरकार सत्तेत असताना राज्यसभा आणि विधान परिषदेच्या निवडणुका जाहीर झाल्या. अशा निवडणुकीत सत्ताधारी पक्षाचे पारडे नेहमीच जड असते. अपक्ष, छोट्या पक्षाचे लोकप्रतिनिधी यांना आपल्याकडे वळवण्यासाठी सत्ताधारी पक्षाकडे अनेक शस्त्रे असतात. असे असताना भारतीय जनता पार्टीने राज्यसभा निवडणुकीत तिसरा उमेदवार उभा केला होता. त्यावेळी मुख्यमंत्री असलेल्या उद्धव ठाकरे आणि त्यांच्या संजय राऊत यांच्यासारख्या सहकाऱ्यांना त्यांच्या विजयाची भलतीच खात्री होती. असे असताना देवेंद्रजींनी संख्याबळाच्या दृष्टीने तिसरा उमेदवार उभा करून चूक केली असे राजकीय अभ्यासक, पत्रकार म्हणत होते. देवेंद्रजींनी ११२ आमदारांच्या बळावर असे फासे टाकले की, महाविकास आघाडीतील मतांमध्ये फाटाफूट होऊन धनंजय महाडिक हे भाजपाचे तिसरे उमेदवार विजयी झाले. विजयासाठी आवश्यक असणाऱ्या मतांची जुळवाजुळव कशी करायची याची पक्की रणनिती तयार करून आणि ती प्रत्यक्षात आणून देवेंद्रजींनी उद्धव ठाकरे,



**१२ जुलै २०२६ पर्यंतचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा एकूण कार्यकाळ**

**१) पहिला कार्यकाळ – ३१ ऑक्टोबर २०१४ – १२ नोव्हेंबर २०१९ = १,८३९ दिवस**

**२) दुसरा कार्यकाळ – २३ नोव्हेंबर २०१९ – २८ नोव्हेंबर २०१९ = ६ दिवस**

**३) तिसरा कार्यकाळ (अजून सुरू) – ५ डिसेंबर २०२४ – १२ जुलै २०२६ = ५८५ दिवस**

शरद पवार यांना मोठा धक्का दिला. विजयोत्सवासाठी पत्रकारांना आमंत्रण देणाऱ्या उद्धव ठाकरे यांना आपला उमेदवार कसा पराभूत झाला, हे कळालेच नाही. त्या पाठोपाठ झालेल्या विधान परिषद निवडणुकतही देवेंद्रजींनी पक्षाचा अतिरिक्त उमेदवार निवडून आणत महाविकास आघाडीला दणका दिला. नेपोलियन बोनापार्टचे युद्ध नीतीबाबत प्रसिद्ध वचन आहे. "Never interrupt your enemy when he is making a mistake". शत्रू चुका करत असताना त्याला सावध करू नका, असा याचा अर्थ आहे. देवेंद्रजींनी महाविकास आघाडीच्या धुरीणांना गाफिल ठेवत राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीत विजयाचा बार उडवून दिला. भाजपाची मते फोडण्याची स्वप्ने पाहणाऱ्या उद्धव ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना देवेंद्रजींनी धोबीपछाड दिला. या दोन विजयापाठोपाठ देवेंद्रजींनी राज्यात सत्तापालट घडवून आणत आपला विश्वासघात करणाऱ्यांना धडा शिकवला.




**मुंबई-पुणे प्रवासाचे अंतर कमी करणारा कनेक्टिंग लिंक, अटल सेतूसारखे महत्वाकांक्षी प्रकल्प सुरू झाले आहेत. अभियांत्रिकीतील चमत्कार म्हणून ओळखले जाणारे हे प्रकल्प महाराष्ट्राचे वैभव वाढवणारे ठरले आहेत.**

मराठा आरक्षणाचा विषयही राज्यात चांगला तापला होता. मराठा समाजाने राज्यभर काढलेल्या मोर्चांमुळे वातावरण ढवळून निघाले होते. या कठीण परिस्थितीतही देवेंद्रजींनी अत्यंत शांतपणे वेगवेगळे निर्णय घेतले. मराठा संघटनांचे मोर्चे निघत असताना देवेंद्रजींवर अत्यंत शिवराळ भाषेत सोशल मीडियावरून टीका चालू होती. मात्र देवेंद्रजी विचलित झाले नाहीत. आरक्षणाचा निर्णय होईपर्यंत त्यांनी मराठा समाजाला वेगवेगळ्या सोयी-सवलती दिल्या. अन्य मागासवर्गीय समाजाच्या (ओबीसी) सवलती मराठा समाजाला देणे, मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे चालू करणे यासारखे निर्णय देवेंद्रजींनी तातडीने घेतले. मराठा विद्यार्थ्यांची निम्मी फी भरणे, १० लाखांपर्यंतचे शैक्षणिक कर्ज माफ करणे यासारखे निर्णय घेणे सोपे नव्हते, याचे कारण या निर्णयांमुळे सरकारी तिजोरीवर मोठा भार पडणार होता. मात्र असे निर्णय घेताना देवेंद्रजी कचरले नाहीत.

धडाडीने निर्णय घेणे हे देवेंद्रजींच्या कार्यपद्धतीचे मोठे वैशिष्ट्य आहे. मराठा आरक्षणाचा निर्णय जाहीर केल्यानंतर वैद्यकीय अभ्याक्रमासाठी आरक्षण लागू होणार नाही, असा निकाल न्यायालयाने दिल्याने मराठा क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते संतप्त झाले. त्यांनी पुन्हा सरकारविरुद्ध आंदोलनाची भाषा सुरू केली. या स्थितीत मराठा विद्यार्थ्यांनी खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घ्यावा, त्यांच्या शैक्षणिक शुल्काचा भार सरकार उचलेल असा प्रस्ताव देवेंद्रजींपुढे मांडला गेला. सरकारी वैद्यकीय


अटल सेतू

महाविद्यालयात जेवढे शुल्क भरावे लागते तेवढे शुल्क मराठा विद्यार्थ्यांनी भरावे, उर्वरित शुल्क सरकार भरेल, असा निर्णय देवेंद्रजींनी घेतला. यासाठी सरकारला २८ कोटींची तरतूद करावी लागणार होती. ही आकडेवारी तयार झाल्यावर त्यासाठीच्या तरतुदीस देवेंद्रजींनी तातडीने मान्यता दिली. मराठा विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय प्रवेशाबाबत राज्य सरकारने वटहुकूम काढला. मराठा विद्यार्थ्यांसाठी जो निर्णय घेतला तोच निर्णय खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांना लागू करण्याचा निर्णय देवेंद्रजींनी घेतला. असे निर्णय घेणे सोपे नसते. कारण यासाठी काहीशे कोटींची तरतूद करावी लागणार होती. न्यायालयाच्या निर्णयाकडे बोट दाखवत सरकार स्वस्थ बसून राहू शकले असते. मात्र देवेंद्रजींमधील सहृदय माणूस त्यांना असे निर्णय घेण्यास प्रवृत्त करतो. अशा अनेक निर्णयांमधून देवेंद्रजींमधील प्रजेच्या हितासाठी सदैव दक्ष असलेल्या राज्यकर्त्याचे दर्शन घडते. मला त्यांच्याबरोबर काम करण्यास मिळाले हे माझे भाग्यच आहे. देवेंद्रजींना वाढदिनाच्या अनेकोत्तम शुभेच्छा. त्यांची राजकीय वाटचाल अशीच उज्ज्वल राहो, अशी आई भवानीचरणी प्रार्थना. ■

# चक्रव्यूह भेदणारा आधुनिक अभिमन्यू



● रवींद्र अनासपुरे, प्रदेश मुख्यालय प्रभारी

> कुशल राज्यकर्त्याबरोबरच देवेंद्रजींच्या स्वभावातील लढाऊ वृत्ती भावणारी आहे. कितीही संकटे आली तरी देवेंद्रजी मानसिकदृष्ट्या स्थिर असतात. संकटांमुळे, अपयशामुळे खचण्याचा, डगमगून जाण्याचा त्यांचा स्वभाव नाही. अशा संकटांतून यशस्वीरित्या कसे बाहेर पडायचे याचा विचार ते शांतपणे करत असतात. या त्यांच्या मनोवृत्तीमुळे विरोधकांना त्यांच्या चालीचा कधी अंदाजच येत नाही.


२०१४ मध्ये देवेंद्रजींवर पक्ष नेतृत्वाने मुख्यमंत्री जबाबदारी सोपविली. तेव्हा अनेक अभ्यासकांनी, राजकीय नेत्यांनी देवेंद्रजींना ही जबाबदारी पेलवेल का, अशी शंका व्यक्त केली होती. याला कारण अर्थातच महाराष्ट्राची सामाजिक पार्श्वभूमी होती. मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर काही महिन्यांतच देवेंद्रजींनी आपला प्रभाव आणि वेगळी ओळख निर्माण करण्यास सुरूवात केली. हळूहळू त्यांनी सत्तेवरील मांड घट्ट करत आपण राजकारणात कच्चे नाही, हे दाखवून दिले. त्यावेळी उद्धव ठाकरे हे सरकारमध्ये राहून केंद्र आणि राज्य सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध करत होते. काँग्रेस, शरद पवार आणि उद्धव ठाकरे असे तीन प्रबळ विरोधक समोर असताना देवेंद्रजींनी राज्य सरकारची धुरा अत्यंत सक्षमपणे वाहिली. सत्तेवर आल्यानंतर काही दिवसातच वेगवेगळ्या आंदोलनाच्या माध्यमातून देवेंद्रजींपुढे संकटांचा चक्रव्यूह निर्माण करण्यात आला. जातीवरून त्यांच्यावर असभ्य भाषेत चिखलफेक करण्यात आली. मात्र हा योद्धा अशा संकटांमुळे कधीच नाउमेद झाला नाही. अशा संकटातून सुखरूप बाहेर पडत विरोधकांची

तटबंदी कशी मोडून काढायची, याचे तंत्र देवेंद्रजींना अवगत आहे. २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीने महायुतीपेक्षा अधिक जागा मिळवल्या. त्यामुळे संघटनेत काहीसे निराशेचे वातावरण होते. देवेंद्रजींनी त्या निकालाची जबाबदारी घेत आपल्याला उपमुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्याची विनंती पक्ष नेतृत्वाला केली होती. पक्ष नेतृत्वाने त्यांची विनंती मान्य केली नाही. लोकसभा निवडणुकीतील पीछेहाटीची कारणे शोधत देवेंद्रजी लगोलग कामाला लागले. संविधान बदलाचा अपप्रचार हा मुद्दा महायुतीच्या पीछेहाटीला जबाबदार होता. व्होट जिहाद हा मुद्दाही महाविकास आघाडीच्या चांगल्या कामगिरीला कारणीभूत होता. देवेंद्रजींनी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांच्या बैठका घेत संघटनेत आलेली निराशा संपविण्याचा प्रयत्न केला. आघाडी आणि महायुती यांच्यातील फरक फक्त दोन लाख मतांचा आहे, हा फरक आपण परिश्रम घेऊन भरून काढू शकतो, असा विश्वास देवेंद्रजींनी सामान्य कार्यकर्त्यांमध्येही निर्माण केला. व्होट जिहादसारखे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी देवेंद्रजींनी राष्ट्रवादी विचारांच्या संघटनांचे सहकार्य घेण्याची रणनिती आखली. या रणनितीला मोठे यश मिळाले आणि विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा दणदणीत पराभव झाला.

२०१९ मध्ये स्पष्ट बहुमत मिळूनही उद्धव ठाकरेंनी ऐनवेळी केलेल्या दगाबाजीमुळे देवेंद्रजींचा हाता-तोंडाशी आलेला मुख्यमंत्रीपदाचा घास हिरावला गेला. त्या स्थितीत त्यांनी विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी सांभाळली. महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत नवे आहे, त्यामुळे लगेच या सरकारवर टीका करणार नाही, अशी उदारमतवादी भूमिका देवेंद्रजींनी घेतली. मात्र उद्धव ठाकरे यांच्या सरकारचा नाकर्तेपणा, खुनशीपणा वाढू लागला तेव्हा देवेंद्रजींनी उग्र अवतार धारण करत महाविकास आघाडी सरकारला धारेवर धरले. विरोधी पक्षनेता कसा असावा याचे यथार्थ दर्शन देवेंद्रजींनी त्या काळात घडवले. प्रख्यात उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या निवासस्थानाबाहेर स्फोटकांनी भरलेली स्कॉर्पिओ २५ फेब्रुवारी २०२१ रोजी सापडली होती. ही स्कॉर्पिओ मनसुख हिरेन या व्यावसायिकाची होती, असे तपासात निष्पन्न झाले. या घटनेमुळे देशभर खळबळ उडाली. अंबानी यांच्या निवासस्थानाबाहेर कडक सुरक्षा व्यवस्था होती. तरीही हा



प्रकार घडल्याने त्याची देशभर चर्चा झाली. ५ मार्च २०२१ रोजी ठाण्याजवळ एका खाडीत हिरेन मृतावस्थेत सापडले. या प्रकरणावरून देवेंद्रजींनी उद्धव ठाकरे सरकारला कोंडीत पकडताना रुद्रावतार धारण केला होता. हिरेन या व्यावसायिकाच्या हत्येप्रकरणी देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात 'सीडीआर'च्या आधारे सचिन वाझे या तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यावर आरोप केले. मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाबाहेर सापडलेल्या स्फोटकाच्या वाहनासंदर्भात वाझे यांच्यावर आरोप झाले त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी विधिमंडळात बोलताना वाझे म्हणजे कोणी लादेन नव्हे अशा शब्दात वाझे यांची पाठराखण केली होती. फडणवीस यांनी सीडीआर सादर केल्यावर या वाझेंना अटक करण्याशिवाय या सरकारला पर्यायच राहिला नव्हता. देवेंद्रजींनी उद्धव ठाकरे सरकारवर आरोप करताना सचिन वाझे आणि मनसुख हिरेन यांचा सीडीआर रिपोर्टच विधिमंडळात सादर केला. इतका भक्कम पुरावा असल्यामुळे उद्धव ठाकरे आणि त्यांच्या मंत्र्यांची बोलती बंद झाली. देवेंद्रजी आणि भाजपाच्या काही आमदारांवर खोटे गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न उद्धव ठाकरे सरकारने केला होता. या कारस्थानाचा पर्दाफाश देवेंद्रजींनी पुराव्यासकट विधानसभेत केला. महाविकास आघाडीच्या नाकर्त्या कारभाराचा देवेंद्रजींनी विधानसभेत अनेकदा पंचनामा केला. कोणतीही जबाबदारी गंभीरपणे, अभ्यासूपणे पार पाडण्याचा देवेंद्रजींचा स्वभाव या घटनांमधून महाराष्ट्राने पाहिला. तत्कालिन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर मुंबईच्या तत्कालिन पोलीस आयुक्तांनी आरोप केल्यानंतर देवेंद्रजींनी पुन्हा उद्धव ठाकरे सरकारला कोंडीत पकडले. त्यामुळे उद्धव ठाकरेंना अनिल देशमुखांचा राजीनामा घ्यावा लागला. **अशा या लढाऊ नेत्याला वाढदिवसाच्या अनेक शुभेच्छा!**



# भाग्यविधाता...

● दिनेश गुणे, ज्येष्ठ पत्रकार

जनतेच्या गरजा आणि समस्यांची नेमकी जाणीव, निश्चित ध्येयधोरणे आणि प्रामाणिक अंमलबजावणीची तीव्र इच्छाशक्ती अशा त्रिगुणांनिशी जे सरकार राज्यकारभार हाती घेते, ते सरकार त्याच्या कार्यकालात निर्विवादपणे यशस्वी ठरते, हे जागतिक सत्य आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहता, भारतीय जनता पार्टी नावाच्या जगातील सर्वात मोठ्या राजकीय पक्षाला महाराष्ट्रात मोठा जनाधार मिळाला, पक्षाच्या गाठीशी असलेली मतांची टक्केवारी वाढली, आणि हा पक्ष जनतेच्या पसंतीस उतरला आहे, हे स्पष्ट होते.

**सन** २०१४ ते २०२६ या सुमारे एक तपाच्या काळातील दोनतीन वर्षांचा राजकीयदृष्ट्या नगण्य असा काळ वगळता, महाराष्ट्रात सत्तेवर असलेल्या भाजपाच्या बाबतीत हा निकष लावता येतो. कारण, त्या दशकाच्या काळातच भाजपचा देशव्यापी भाग्योदय सुरू झाला होता, आणि महाराष्ट्रात भाजपाच्या विजयाची पताकाही डौलाने फडकू लागली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाचा करिष्मा आणि राज्यातील देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली कानाकोपऱ्यात पक्ष पोहोचविणारी नेते, कार्यकर्त्यांची भक्कम फळी यांमुळे भाजपला पर्याय नाही, याची खूणगाठ मतदाराने बांधली, आणि देशभर घोंघावणारे भाजपचे भगवे वादळ, महाराष्ट्रात भक्कमपणे स्थिरावले. २०१४, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक संख्याबळ असलेला पक्ष म्हणून भाजपने बाजी मारली, गेल्या चार वर्षांत झालेल्या प्रत्येक निवडणुकीत भाजपला मतदारांचा कौल मिळाला, आणि आता भाजपच्या झेंड्याखाली, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचा भाग्योदय सुरू झाला आहे.

गेल्या एक तपाच्या महाराष्ट्राच्या राजकीय वाटचालीतील महाविकास आघाडी सरकारचा कार्यकाळ हे महाराष्ट्राच्या राजकारणास पडलेले एक दुःस्वप्न होते असे म्हणावे



लागेल. त्या काळात महाराष्ट्राची राजकीय संस्कृती बिघडली. पण याच काळात जनादेशाचा आदर करण्याच्या आणि राज्याच्या विकासाच्या एकमेव ध्यासामुळे तो कडवट काळ संयमाने पचविण्याच्या देवेंद्र फडणवीस यांच्या प्रामाणिकपणाचे दर्शनदेखील घडले. त्यामुळेच मतदारांनी या पक्षास कौल दिला. भाजपसोबत सत्तेत राहून विरोध करणाऱ्या आणि नंतर सत्तेसाठी भाजपची साथ सोडून जनादेश धुडकावत काँग्रेससोबत सत्तासोबत करणाऱ्या ठाकरे यांच्या शिवसेनेला मतदारांची पसंती नव्हती, हे स्पष्ट झाले. कारण, २०१९ मध्ये ठाकरेंनी केवळ भाजपाचा नव्हे, तर जनादेशाचाही अपमान केला होता.

आज देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या कारकिर्दीचा लेखाजोखा मांडताना, कालपर्यंतच्या राजकीय परिस्थितीचा आढावा आवश्यक ठरतो. कारण, मतदारांच्या पहिल्या पसंतीचा पक्ष म्हणून या पक्षाने २०१४ मध्ये प्रस्थापित केलेली आपली प्रतिमा आता देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वामुळे अधिक उजळली आहे. फडणवीस सरकारच्या कामगिरीवर मतदारांची पसंतीची मोहोर उमटली आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या सत्ताकाळात नेमके असे काय घडले, ज्यामुळे मतदार भक्कमपणे भाजपच्या पाठीशी आहे, ते पाहण्याकरिता थोडे मागे जावे लागेल. म्हणजे, फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपने पहिल्यांदा सत्ताग्रहण केले त्या पाच वर्षांतील फडणवीस सरकारच्या प्रशासकीय अंमलाखाली असलेला महाराष्ट्राचा एक तौलनिक पट मांडला, तरीही त्या काळात सरकारने महाराष्ट्राकरिता केलेल्या भरीव कामगिरीचे चित्र स्पष्ट होऊ शकते. सिंचनाअभावी शेती क्षेत्राची होणारी परवड थांबविण्यासाठी जलयुक्त शिवार योजना, गाळमुक्त नद्या व गाळयुक्त शिवार, शेतकऱ्यांना अखंड वीजपुरवठा, अशा काही योजनांचा देशभर बोलबाला झालाच, पण महाराष्ट्राच्या अनेक अंगांनी विकासाची फळे चाखली. राज्यात उपलब्ध झालेल्या रोजगाराच्या विविध संधी, नव्या गुंतवणुकीतून निर्माण झालेले उद्योग, कृषी क्षेत्रास मिळालेली संजीवनी, अशी अनेक कारणे सामाजिक जनजीवनाचा आलेख उंचावण्यास कारणीभूत ठरतात. दरडोई उत्पन हा त्याचा मापदंड मानला, तर जेमतेम तीन वर्षांच्या आत झालेली ही वाढ म्हणजे फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्वाची आणि महायुती सरकारच्या सकारात्मकतेची खूण ठरली आहे.

रोजगार निर्मिती हे राज्याच्या कुशल प्रशासनाचे महत्वाचे अंग असते. कृषी क्षेत्रास उभारी देताना, उद्योग, पर्यटन आदी क्षेत्रांमध्येही विश्वासाचे वातावरण तयार करणे हे कोणत्याही सरकारसमोरील आव्हान असते. फडणवीस सरकारच्या कारकिर्दीचा प्रत्येक टप्पा या क्षेत्रांत विक्रम नोंदविणारा ठरला आहे. डिसेंबर २०१९ अखेर महाराष्ट्रात दोन लाख १३ हजार ४०० कोटींची औद्योगिक गुंतवणूक आणि १३ लाख रोजगारक्षमता निर्माण झाली होती. महाविकास आघाडी सरकारच्या काळात ही गती मंदावली. गुंतवणुकीच्या दृष्टीने नकारात्मक वातावरण तयार झाले. खंडणीखोरी, हप्ता वसुलीला ऊत आला. ही नकारात्मकता पुसून टाकून देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत कौशल्याने महाराष्ट्राला पुन्हा उद्योगस्नेही बनविण्यासाठी घेतलेल्या प्रयत्नपूर्वक परिश्रमांमुळे आज महाराष्ट्र हे देशातील पहिल्या क्रमांकाचे औद्योगिक गुंतवणूक आकर्षित करणारे राज्य ठरले आहे.

महानगरी मुंबईतील महत्वाकांक्षी मेट्रो प्रकल्पास गती देणारे सरकार, समृद्धी महामार्ग साकारून राज्याचा


कानाकोपरा जोडणारे सरकार, मुंबई–पुणे दरम्यानच्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पास 'कनेक्टिंग लिंक' म्हणून वास्तवात आणणारे सरकार, अशा अनेक विकास कामांमुळे फडणवीस सरकारच्या कारकिर्दीची दखल इतिहासाला घ्यावीच लागेल. महाविकास आघाडी सरकारच्या काळात मेट्रो प्रकल्पातील अनेक महत्वाकांक्षी योजना केवळ सरकारच्या नकारात्मकतेमुळे ठप्प झाल्या. मेट्रो कारशेडचा प्रस्तावित प्रकल्प केवळ अहंकारापोची बासनात गेला, आणि वाढत्या खर्चाचा दैनंदिन बोजा मात्र मुंबईकरांना सहन करावा लागला. ज्या योजनांनी राज्याच्या जनतेस सुखाचे दिवस दाखविले, त्या योजना बासनात गुंडाळून ठाकरे सरकारने त्यावेळी फडणवीस यांची केवळ द्वेषापोटी राजकीय कोंडी केली, आणि महाराष्ट्राच्या जनतेला त्याची किंमत भविष्यात मोजावी लागली. ते दुःस्वप्न संपले आणि महाराष्ट्राचे भाग्य उजळून टाकणारा काळ सुरू झाला.

मागेल त्याला शेततळे ही फडणवीस यांच्या सरकारची ऐतिहासिक कामगिरी ठरली आहे. शेतकऱ्यांच्या शाश्वत व संरक्षित सिंचनाची सुविधा निर्माण करण्याच्या हेतूने निर्माण करण्यात आलेली ही योजना खऱ्या अर्थाने राज्याच्या कृषी क्षेत्राची संजीवनी ठरली. पावसाचे वाहून जाणारे पाणी शेतात तयार केलेल्या कृत्रिम तळ्यात साठवून पाऊस नसतानाच्या काळात पिकांच्या सिंचनाकरिता या पाण्याचा वापर करण्याची ही महत्वाकांक्षी योजना, ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालट करणारी ठरली आहे, तर पावसाचे वाया जाणारे पाणी अवर्षणप्रवण भागांत वळविण्याचे प्रकल्प महाराष्ट्राचे भविष्य उजळून टाकणारे ठरणार आहेत. कोरडवाहू जमिनीवरील पिकांकरिता पाणलोट विकास कार्यक्रम, तसेच एकात्मिक शेती, पाणी वापराचे व्यवस्थापन, यातून शेतीची उत्पादकता वाढविण्याकरिता सुरू झालेल्या राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, जमिनीचा पोत अबाधित राखण्याकरिता सॉईल हेल्थ कार्डची योजना, कोरडवाहू तसेच परंपरागत शेतीच्या विकासाच्या योजना, अशा अनेक योजनांमुळे राज्याच्या कृषी क्षेत्रास मिळालेली उभारी हे या काळातील सरकारी इच्छाशक्तीचे यश म्हणावे लागेल. परंपरागत कृषी विकासाच्या योजना राबविण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ठोस कल्पना आहेत. ती केवळ स्वप्ने नाहीत, तर त्यांच्या अंमलबजावणीसाठी सरकारने कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला आहे. शेतकऱ्यांच्या परंपरागत शेतीस प्रोत्साहन देण्याचे आगळे काम याच सरकारच्या कारकिर्दीत नोंदले गेले आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना, हवामानावर आधारित पिकांचा विमा, शेतकरी अपघात विमा योजना, नैराश्याच्या गर्तेतून शेतकऱ्यांना सोडविणारी कर्जमुक्ती आणि थकबाकी माफी योजना, कृषी यांत्रिकीकरण आदी योजनांमुळे शेतकऱ्यांना समृद्धीची दिशा सापडणे आता सोपे झाले आहे, आणि उन्नत शेती–समृद्ध शेतकरी योजनेमुळे शेती व्यवसायातील हजारो कुटुंबांना आत्मभान सापडले आहे. शेतकऱ्यांच्या मनात आत्मविश्वास रुजू लागला आहे.

महाराष्ट्राच्या भविष्याला दिशा देण्याचा ध्यास घेतलेल्या देवेंद्र फडणवीस नावाच्या या उमद्या नेत्याने आपल्या सामाजिक जबाबदारीचा वाटाही उचलला आहे. गतिशील औद्योगिक वाढ आणि शाश्वत विकास ही दोन उद्दिष्टे समोर ठेवून आखलेल्या औद्योगिक धोरणाने भविष्याच्या वाटचालीचे मार्गदेखील आखून ठेवले आहेत. उदयोन्मुख क्षेत्रांच्या विकासाला चालना मिळावी यासाठी काही उद्दिष्टेही ठरवून दिली, आणि प्राधान्य क्षेत्रेही आखून ठेवली. विद्युत वाहनांचा वापर, कृत्रिम बुद्धिमत्ता, त्रिमिती छपाई, महाजाल व यंत्रमानव विज्ञान, अतिसूक्ष्म तंत्रज्ञान, एकात्मिक माहिती केंद्र संकुले, वस्त्रोद्योग यंत्रसामग्री उत्पादन, कृषी व अन्नप्रक्रिया उद्योग, माहिती–तंत्रज्ञानाधारित सेवांना प्रोत्साहन आदी योजना महाराष्ट्राच्या भविष्याची ग्वाही देणार आहेत. फडणवीस सरकार पायउतार झाल्यानंतर नव्याने सत्तारूढ झालेले सरकारने त्या योजना इच्छाशक्तीने पुढे नेल्या, तर महाराष्ट्राचे भविष्य निसंदेह पणे उज्ज्वल असेल.

केंद्र आणि राज्य शासनाच्या सहभागातून निर्माण करण्यात येत असलेल्या समृद्धी महामार्ग, दिल्ली–मुंबई औद्योगिक मार्गिका, सागरमाला, भारतमाला, अशा प्रकल्पांवर औद्योगिक वसाहती उभ्या करण्याचा संकल्प फडणवीस सरकारने सोडला होता. भविष्यात या योजना साकार होतील, त्याद्वारे राज्यातील हजारो युवकांना नव्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, आणि महाराष्ट्र समृद्धीच्या शिखरावर पोहोचेल, तेव्हा त्या समृद्धीची बीजे फडणवीस सरकारने रुजू घातली होती, याची नोंद इतिहास नक्कीच घेईल. ■

# भारताची एकता आणि प्रगतीसाठी समर्पित जीवन



● नरेंद्र मोदी, पंतप्रधान

> राष्ट्रवाद आणि निःस्वार्थ सेवेचा आदर्श मानणाऱ्या, त्यांची जपणूक करणाऱ्या सर्व लोकांसाठी डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांची १२५वी जयंती हा दिवस विशेष होता. भारतमातेच्या सेवेप्रती कटिबद्धता आणि धैर्य यांचे ते कालातीत मूर्तिमंत उदाहरण आहेत.

**डॉ. श्यामाप्रसाद** मुखर्जी यांचा जन्म अशा परिस्थितीत झाला होता, जिथे, त्यांना सहज एक आरामदायी आणि सुरक्षित आयुष्य मिळू शकले असते. त्यांचे पिता सर आशुतोष मुखर्जी शिक्षणतज्ज्ञ होते. प्रखर बुद्धिवादी असे हे व्यक्तिमत्व होते. नियतीने त्यांना एक अत्यंत उच्चभ्रू, सुखासीन आयुष्य दिले, तरी त्यांच्यातील विवेकाने, त्यांना देशसेवा आणि त्यागाचा मार्ग दाखवला. त्या काळातील अत्यंत अस्थिर परिस्थितीत आपण केवळ बघ्याची भूमिका घेऊ शकत नाही, असा कौल त्यांच्या मनाने त्यांना दिला. मग ती वसाहतवादी शक्तींशी लढाई असो, जातिवाद, धर्मभेद किंवा मग मानवतेसमोरची आव्हाने असोत, अथवा इतर काही. त्यांच्या या प्रवासात त्यांना वैयक्तिक आयुष्यात अनेक संकटे, दुःखाचा सामना करावा लागला, पण या दुःखांनी त्यांचा दृढनिश्चय कमी झाला तर नाहीच, पण तो अधिक दृढ झाला.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या सार्वजनिक जीवनातील एक आदर्श, जो या सगळ्या गुणांच्या वर होता, असे सांगायचे झाले, तर म्हणजे अखंड भारताप्रती त्यांची निष्ठा! फाळणीच्या गदारोळात, हिंसाचारातही, पश्चिम बंगाल हा भारताचा अविभाज्य घटक राहील, यासाठी ते पाय घट्ट रोवून उभे राहिले. काही वर्षांनी, त्यांच्या याच अखंडतेच्या ध्यासाने, ते जम्मू आणि काश्मीरला गेले.

तिथे झालेला तुरुंगवासही त्यांना ध्येयापासून परावृत्त करु शकला नाही. मात्र, याच तुरुंगवासात त्यांचा अकाली मृत्यू झाला.


### राजकारणाच्या पलीकडे

इतिहासात असे काही क्षण येतात, जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या सर्वोच्च बलिदानामुळे ती व्यक्ती राजकारणाच्या पलीकडे जाते आणि त्यांची कामगिरी हा 'राष्ट्रीय स्मृतीं' चा विषय ठरतो. आचार्य विनोबा भावे एकदा असे म्हणाले होते की, ज्या तत्वावर श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा दृढ विश्वास होता, त्यासाठी त्यांनी बलिदान दिले. या घटनेनंतर अनेक वर्षांनी, कलम ३७० आणि अनुच्छेद ३५ (अ) हटवणे (२०१९ चा कायदा), ही त्यांच्या बलिदानाला दिलेली सर्वोच्च मानवंदना होती.

### भारतीय मूल्ये शिरोधार्य

डॉ. मुखर्जी यांनी कायमच भारताला आणि भारतीय मूल्यांना प्रथमस्थानी ठेवले. त्यासाठी त्यांनी त्या काळातील प्रचलित विचारसरणींना छेद देणाऱ्या संस्था उभारून आणि सक्षम व्यवस्था घडवून हे सिद्ध केले. ते कोलकाता विद्यापीठाचे सर्वांत तरुण कुलगुरू बनले. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यशैलीद्वारे त्यांनी देशभक्तीची प्रेरणा देणारे आणि भविष्याची दृष्टी असलेले सकारात्मक बदल घडवून आणले. शिक्षणतज्ज्ञांच्या एका परिषदेत बोलताना डॉ. मुखर्जी यांनी समर्पक शब्दांत म्हटले होते की, शैक्षणिक संस्थांकडे संभाव्य कारकून आणि अल्प वेतनावर काम करणारे कर्मचारी तयार करणारे कारखाने म्हणून पाहणे चुकीचे आहे. नगरपालिका, प्रांतीय आणि केंद्रीय विधिमंडळे यांसारख्या आपल्या स्वशासित संस्थांना नेतृत्व देण्यास सक्षम असलेले, तसेच वित्तीय, व्यापारी आणि औद्योगिक अशा जीवनाच्या विविध क्षेत्रांतील कामकाजाचे संचालन करू शकणारे विद्यार्थी घडविणे आवश्यक आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली कोलकाता विद्यापीठाने ग्रंथालयाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे, विज्ञान विषयातील संशोधनाला चालना देणे, पुरातत्व अध्ययनाला प्रोत्साहन देणे तसेच कृषी विषयातील अभ्यासक्रम सुरू करणे, अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी केली, त्यांनी क्रीडा, शिक्षक प्रशिक्षण आणि विद्यार्थी कल्याण यांसारख्या क्षेत्रांकडेही विशेष लक्ष वेधले. विद्यार्थी आणि माजी विद्यार्थ्यांमध्ये विद्यापीठाबद्दल अभिमानाची भावना निर्माण व्हावी, यासाठी त्यांनी २४ जानेवारी हा दिवस विद्यापीठाचा 'स्थापना दिन' म्हणून साजरा करण्याची परंपरा सुरू केली. विद्यापीठासाठी गीत रचण्याची विनंती त्यांनी थेट गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनाच केली होती.




त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी भारतीय जनसंघाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. त्यातूनही हीच भावना दिसून येते. त्या काळात काँग्रेस पक्षाचे सगळीकडे वर्चस्व असताना, भारताच्या प्रगतीसाठी सक्षम पर्याय उभा राहणे त्यांना गरजेचे वाटत होते.

मला एक वैयक्तिक अनुभव सांगायचा आहे. आत्मनिर्भरतेच्या स्पष्ट दृष्टिकोनातून डॉ. मुखर्जी यांनी प्रयत्नपूर्वक उभारलेल्या 'सिंद्री खत प्रकल्पा'कडे अनेक

दशके देशाचे नेतृत्व करणाऱ्यांनी दुर्लक्ष केले. मला अभिमान वाटतो की, आमच्या सरकारला या परंपरेच्या पुनरुज्जीवनात योगदान देण्याची संधी मिळाली. त्या कार्यक्रमात उपस्थित राहणे हा खरोखरच माझ्यासाठी सर्वांत विशेष असा अनुभव होता.

देशाच्या प्रगतीसाठी आपल्या सांस्कृतिक मुळांशी जोडलेले राहून पर्यायी आवाज उभा राहणे अधिक आवश्यक असल्याचे त्यांना वाटत होते. कदाचित म्हणूनच जनसंघाचे निवडणूक चिन्ह मातीचा दिवा होते. एक दिवा दिसायला साधा वाटू शकतो; मात्र स्वतःच्या मर्यादेपेक्षा कितीतरी अधिक अंधार दूर करण्याची क्षमता त्याच्यामध्ये असते. जनसंघाने आपल्या कार्यरत असलेल्या काळात आणि त्यानंतरही नेमके हेच कार्य केले.

भारताचे पहिले उद्योग आणि पुरवठा मंत्री म्हणून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा कार्यकाळ हा विकासाविषयी अत्यंत व्यापक आणि मानवतावादी दृष्टिकोन असलेल्या एका नेत्याचे दर्शन घडवतो. नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्राचा सन्मान, संधी आणि आत्मविश्वास पुनर्स्थापित करण्याचे साधन म्हणून त्यांनी उद्योगांकडे पाहिले. संपत्तीची निर्मिती आणि मूल्यवर्धन यांचा त्यांनी आदर केला.

दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन, सिंद्री खत प्रकल्प आणि भक्कम औद्योगिक धोरण यांसारख्या अग्रणी उपक्रमांद्वारे आधुनिक औद्योगिक भारताचा पाया रचत असतानाच, भारताच्या पारंपरिक सामर्थ्यांकडे दुर्लक्ष होणार नाही, याचीही त्यांनी खात्री केली. हातमाग, कुटीर उद्योग, कारागीर आणि वस्त्रोद्योगातील कामगार यांनाही त्यांच्यामध्ये तितकाच कटिबद्ध पुरस्कर्ता लाभला.

### संवाद आणि चर्चांना महत्त्व

भारताच्या सांस्कृतिक परंपरेने फार पूर्वीपासून संवाद आणि चर्चांना महत्त्व दिले आहे. डॉ. मुखर्जी यांनी याच लोकशाही मूल्यांचे प्रतिनिधित्व केले होते. सुरुवातीच्या काळात राष्ट्र उभारणीचे कार्य राजकीय मतभेदांच्या पलीकडचे आहे, असा विश्वास बाळगून ते पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात सामील झाले, त्यांनी प्रामाणिकपणे आणि विधायक भावनेने काम केले; परंतु जेव्हा त्यांना वाटले की राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नांसाठी वेगळ्या मार्गाची आवश्यकता आहे, तेव्हा त्यांनी सन्मानाने पदाचा त्याग केला आणि राष्ट्राला आवश्यक असलेल्या राजकीय कार्यासाठी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले. ७५ वर्षांपूर्वी, पंडित नेहरूंनी पहिले घटनादुरुस्ती विधेयक आणले, जे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर थेट आघात करणारे होते. डॉ. मुखर्जी हे विधेयकाच्या सर्वात कट्टर विरोधकांपैकी एक होते. काँग्रेस काय करू शकते, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. आणि पुढील घडामोडींनी त्यांची भूमिका योग्य असल्याचे सिद्ध केले. ज्यांनी ७५ वर्षांपूर्वी पहिले घटनादुरुस्ती विधेयक आणले, त्यांनीच १९७५ मध्ये आणीबाणी लादली आणि त्यानंतर ४२वी घटनादुरुस्ती करून उदारमतवादी लोकशाही मूल्यांच्या मुळावर घाव घातला.

### मानवतावादी कार्य

डॉ. मुखर्जी त्यांच्या मानवतावादी कार्यासाठीही ओळखले जातात. १९४३ मध्ये जेव्हा बंगालमध्ये भीषण दुष्काळ पडला, तेव्हा डॉ. मुखर्जींनी स्वतःला पीडितांच्या सेवेत झोकून दिले. लोकांना अन्न मिळावे, यासाठी त्यांनी अनेक उपहारगृहे आणि मदत केंद्रे उघडली जातील याची खात्री केली. एकीकडे ते आपल्या लोकांच्या दुर्दशेने अत्यंत व्यथित झाले होते, तर दुसरीकडे वसाहतवादी शासकांच्या असंवेदनशीलतेमुळे ते व्यथित झाले होते. त्यांनी 'पंचशेर मन्वंतर' नावाचे एक पुस्तकही लिहिले, ज्यात त्यांनी आपली व्यथा मांडली. १९४२ मध्ये जेव्हा मिदनापुरला महाचक्रीवादळाचा तडाखा बसला, तेव्हा परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची सर्वत्र प्रशंसा झाली.

### तरुणांना आवाहन

कोलकाता येथील एका महाविद्यालयात बोलताना डॉ. मुखर्जी यांनी तरुणांना आवाहन केले, तुम्ही जे काही काम हाती घ्याल, ते गांभीर्याने, सखोलपणे आणि उत्तमरीत्या करा; ते कधीही अर्धवट किंवा अपूर्ण सोडू नका, आणि जोपर्यंत तुम्ही तुमचे सर्वोत्तम योगदान देत नाही, तोपर्यंत समाधानी राहू नका. त्यांनी ज्या मजबूत, एकसंघ, आत्मविश्वासाधारित आणि करुणामय भारतावर दृढ विश्वास ठेवला होता, तो घडवण्यासाठी दररोज प्रयत्न करणे, हीच त्यांच्या स्मृतीला वाहिलेली सर्वोत्तम आदरांजली आहे. आजच्या तरुण पिढीवर माझा पूर्ण विश्वास आहे की, ते या आवाहनाला समर्थन देतील. ■

# महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाचा नवा अध्याय

## महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम २०२६



**राज्यातील** केवळ १५ ते २० टक्के महिलांच्या नावावर सात-बारा उताऱ्याची नोंद आहे. जमिनीची मालकी नसल्याने या कष्टाळू महिलांना शासकीय योजना, बँक कर्ज, पीक विमा, तांत्रिक प्रशिक्षण आणि अनुदानांपासून वर्षानुवर्षे वंचित राहावे लागले आहे. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र सरकारने ऐतिहासिक पाऊल उचलत 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६' हा कायदा विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मांडून तो एकमताने मंजूर केला आहे. हा कायदा केवळ महिलांना हक्क देणारा नसून, राज्यातील कृषी क्षेत्राला आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक क्रांतिकारी दिशा देणारा दस्तऐवज ठरणार आहे. चेन्नई येथील प्रसिद्ध 'एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशन'ने या विधेयकाचा मसुदा तयार करण्यात आणि विविध भागधारकांशी व्यापक चर्चा घडवून आणण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

### अधिनियमाची पार्श्वभूमी आणि निर्मितीची प्रक्रिया

हा अधिनियम अचानक अस्तित्वात आलेला नसून, त्यामागे दीर्घकालीन नियोजन आणि तज्ज्ञांचा सहभाग आहे. आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षाचे औचित्य साधून या विधेयकीची संकल्पना मांडण्यात आली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या थेट मार्गदर्शनाखाली आणि देखरेखीखाली या कायद्याचा मसुदा अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने तयार करण्यात आला. या कायद्याचा अंतिम मसुदा तयार करण्यापूर्वी पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर यांसारख्या विविध महसुली विभागांमध्ये कृषी तज्ञ, कायदेतज्ञ, महिला संघटना आणि शेतकरी प्रतिनिधींसोबत सखोल सल्लामसलत करण्यात आली.

या अधिनियमाचा मुख्य हेतू शेती आणि त्याशी संलग्न क्षेत्रात राबणाऱ्या प्रत्येक महिलेला कायदेशीररित्या 'शेतकरी' म्हणून वैधानिक दर्जा मिळवून देणे हा आहे. राज्य सरकारच्या भूमिकेनुसार, केवळ भू-मालकी हीच शेतकरी असण्याची पूर्वअट असू नये, तर प्रत्यक्ष शेतात श्रम करणे हाच शेतकरी म्हणून ओळखीचा निकष असावा.

### अधिनियमातील महत्त्वपूर्ण कायदेशीर तरतुदी

**या कायद्यामध्ये अत्यंत दूरगामी आणि सर्वसमावेशक कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे पारंपारिक कृषी क्षेत्राची व्याख्या बदलून ती अधिक व्यापक झाली आहे.**

#### ❶ 'शेतकरी' आणि 'कृषी' या व्याख्यांचा विस्तार

**या कायद्याने शेतीची व्याख्या केवळ पीक लागवडीपुरती मर्यादित न ठेवता पूरक व्यवसायांनाही त्यात कायदेशीररित्या समाविष्ट केले आहे. अब पारंपारिक शेतीसह खालील व्यवसायांत राबणाऱ्या महिलांनाही 'शेतकरी' म्हणून दर्जा दिला जाईल.**

- पशुपालन आणि दुग्धव्यवसाय (डेअरी).
- कुक्कुटपालन (पोल्ट्री) आणि मत्स्यशेती (अक्वाकल्चर).
- रेशीम उद्योग आणि मधमाशी पालन.
- मशरूम लागवड आणि गांडूळ खत निर्मिती.
- वनोपज संकलन आणि कृषी वनीकरण.
- शेतीमजूर, भाडेतत्त्वावरील शेती करणाऱ्या आणि स्थलांतरित महिला शेतमजूर.

### ❷ 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' (Woman Farmer Certificate) ची तरतूद

**महिलेच्या नावावर शेतजमीन (सात-बारा) नसली तरीही तिला ती प्रत्यक्ष काम करत असल्याच्या आधारावर अधिकृत 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' दिले जाईल. हे प्रमाणपत्र मिळवण्याची प्रक्रिया अत्यंत सुलभ करण्यात आली आहे:**

**पात्रता:** १८ वर्षांवरील कोणतीही महिला जी महाराष्ट्राची रहिवासी असून वर्षातून किमान एक हंगाम शेती किंवा शेतीपूरक कामात सक्रिय आहे.

**अर्जाची पद्धत:** ग्रामीण भागातील महिला ग्रामपंचायतीकडे, तर निमशहरी किंवा नगरपंचायत क्षेत्रातील महिला संबंधित स्थानिक प्रशासनाकडे अर्ज करतील.

**पडताळणी आणि मुदत:** ग्रामसभा किंवा नगरपंचायतीच्या सभेत अर्जाची छाननी झाल्यानंतर, सहायक कृषी अधिकाऱ्यांमार्फत १५ दिवसांच्या आत प्रमाणपत्र जारी केले जाईल. अर्ज नाकारल्यास योग्य कारणांसह अपील करण्याची कायदेशीर मुभा असेल.

### ❸ त्रिस्तरीय संस्थात्मक संरचना

**या कायद्याची केवळ घोषणा न करता त्याची तळागाळापर्यंत योग्य अंमलबजावणी व्हावी, यासाठी तीन स्तरांवर देखरेख यंत्रणा उभारण्यात आली आहे:**

**महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद:** ही राज्य पातळीवरील सर्वोच्च संस्था असेल, ज्याचे अध्यक्ष स्वतः मुख्यमंत्री असतील. यात उपमुख्यमंत्री, कृषी, महसूल, महिला व बालविकास मंत्री सदस्य असतील, तर कृषी सचिव याचे सदस्य सचिव असतील.

**राज्य संनियंत्रण समिती:** मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन होणाऱ्या या समितीमध्ये कृषी आयुक्त सदस्य सचिव म्हणून काम पाहतील आणि संपूर्ण अंमलबजावणीचे सनियंत्रण करतील.

**महिला शेतकरी सक्षमीकरण कक्ष:** मंत्रालयात कृषी सचिवांच्या देखरेखीखाली हा स्वतंत्र कक्ष कार्यरत असेल. यासोबतच जिल्हा आणि तालुका पातळीवर 'महिला शेतकरी सहाय्य अधिकारी' नियुक्त केले जातील, जे महिलांना प्रमाणपत्र मिळवून देण्यास आणि योजनांचा लाभ घेण्यास मदत करतील.

### ❹ स्वतंत्र निधी आणि डेटाबेसची निर्मिती

महिला शेतकऱ्यांच्या योजनांसाठी 'महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी' नावाचा स्वतंत्र कोष तयार केला जाईल. याशिवाय, महिला शेतकऱ्यांच्या अचूक नोंदी ठेवण्यासाठी आणि त्यांची माहिती इतर शासकीय विभागांशी जोडण्यासाठी एक स्वतंत्र डिजिटल डेटाबेस तयार केला जाईल.

### पारंपारिक आणि नव्या कायदेशीर चौकटीची तुलनात्मक विश्लेषण

**महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रात या अधिनियमामुळे नेमका काय बदल होणार आहे, हे समजून घेण्यासाठी जुन्या आणि नव्या कायदेशीर चौकटीचे तुलनात्मक विश्लेषण खालील सविस्तर मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल:**

पारंपारिक कायदेशीर चौकटीत शेतकरी म्हणून मान्यता मिळणे केवळ सात-बारा जमिनीच्या मालकीवर आधारित होते. मात्र, नवीन कायद्यानुसार प्रत्यक्ष कृषी किंवा संलग्न क्षेत्रातील महिलांचा सहभाग हाच शेतकरी म्हणून ओळखीचा निकष ठरवला गेला आहे, ज्यामुळे भूमीहीन महिलांचाही समावेश सुकर झाला आहे.

**संलग्न क्षेत्रांचा व्यापक समावेश :** जुनी कायदेशीर व्यवस्था प्रामुख्याने पारंपारिक पीक लागवडीपुरती मर्यादित होती. याउलट, नवीन कायद्याने पशुपालन, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग आणि वनोपज गोळा करणे इत्यादींचा त्यात कायदेशीररित्या समावेश केला आहे.

**शासकीय लाभ आणि पतपुरवठा :** पारंपारिक चौकटीत कर्ज किंवा योजनांचा लाभ मिळवण्यासाठी भू-मालकी तारण ठेवणे आवश्यक असल्याने महिलांचा सहभाग मर्यादित होता. आता नवीन कायद्यांतर्गत 'महिला शेतकरी प्रमाणपत्रा'च्या आधारे थेट अनुदान, सुलभ कृषी कर्ज आणि पीक विम्याचा लाभ कोणतीही जमीन गहाण न ठेवता मिळवता येऊ शकेल.

**प्रशासकीय रचना व संनियंत्रण :** जुनी व्यवस्था सामान्य लिंग-तटस्थ (Gender-neutral) स्वरूपाची होती, ज्यात महिलांसाठी विशेष यंत्रणा नव्हती. तर या नवीन कायद्याने महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी एक त्रिस्तरीय रचना निश्चित केली आहे, ज्यामध्ये सक्षमीकरण परिषद, राज्य संनियंत्रण समिती आणि स्वतंत्र सक्षमीकरण कक्षाचा समावेश आहे. ■

# शेतक-यांचे २ लाखांपर्यंतचे कर्ज माफ



**राज्यातील** ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही ऐतिहासिक योजना असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ५० हजार रुपयांचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजनेमध्ये ५० हजार रुपयांचा लाभ देण्याची मर्यादा काढून टाकण्यात आली आहे, अशा शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६–२७ मध्ये कर्जाची उचल करून वेळेत परतफेड करण्याची अट रद्द करण्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राष्ट्रीयकृत, व्यापारी, खासगी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. पूर्वीच्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता. मात्र, नव्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असली तरी दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे.

महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांसाठी २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीसाठी असलेली ५० हजार रुपयांची मर्यादा आणि २०२६–२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला तरी कोणताही पात्र शेतकरी वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कृषी क्षेत्रासाठी राज्य शासन दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपयांचा खर्च करीत असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांच्या वीजबिलासाठी २५ हजार कोटी रुपये खर्च केले जातात. कापसाची १३६ लाख क्विंटल खरेदी करून १० हजार ८८३ कोटी रुपयांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. सोयाबीनचे ६ लाख टन उत्पादन ३ हजार १९८ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आले, तर कांदा खरेदीमुळे बाजारभाव स्थिर राहण्यास मदत झाली आहे. ठिबक सिंचनासाठी प्रलंबित २१७ कोटी रुपये लवकरच वितरित करण्यात येतील, तसेच कृषी समृद्धी योजनेतील उर्वरित निधी पुरवणी मागण्यांतून उपलब्ध करून दिला जाईल, असे त्यांनी सांगितले.

तितकाच महत्त्वाचा दुसरा निर्णय म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६–२७ मध्ये नवीन कर्ज घेऊन ते वेळेत परतफेड करण्याची अटही रद्द करण्यात आली आहे. अनेक शेतकरी या अटीमुळे संभ्रमात होते. शासनाने हा संभ्रम दूर करत नियमित परतफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांनाही दिलासा देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे योजनेचा लाभ अधिक सुलभ आणि सर्वसमावेशक झाला आहे. यापूर्वीच्या घोषणेनुसार, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकीत कर्ज असलेल्या अनेक शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित राहावे लागत होते. नव्या योजनेत हा महत्त्वाचा अडसरही दूर करण्यात आला आहे. आता दोन लाखांपेक्षा अधिक थकबाकी असली, तरी त्यातील दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासनाकडून माफ करण्यात येणार आहे.

या योजनेची आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे तिची अंमलबजावणी अत्यंत व्यापक स्वरूपात केली जात आहे. राष्ट्रीयीकृत बँका, व्यापारी बँका, खासगी बँका तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीच्या आधारे पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात येत आहे. त्यामुळे लाभार्थी निश्चित करण्याच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि अचूकता सुनिश्चित झाली आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी केवळ कर्जापुरत्या मर्यादित नसतात. ■

# शेतक-यांच्या कर्जमुक्तीबद्दल किसान






किसान मोर्चातर्फे देवाभाऊंचा सत्कार– उपस्थिती– प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, भाजपा प्रदेश सरचिटणीस आ. संजय कुटे, आ. रणधीर सावरकर, किसान मोर्चा राष्ट्रीय सरचिटणीस खा. डॉ.अनिल बोंडे, किसान मोर्चा प्रदेश अध्यक्ष रामकृष्ण वेताळ आदी.








# मोर्चातर्फे 'देवाभाऊंचा' सत्कार...
















# नर्मदा पाणी वाटप वाद संपुष्टात

## महाराष्ट्राला १० टीएमसी पाणी मिळणार



**देशाचे** केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शाह तसेच मुख्यमंत्री जलदुत देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने ४ राज्यांमधील नर्मदा पाणी वाटप वाद संपुष्टात आला. तब्बल ४७ वर्षानंतर नर्मदा नदी पाणी वाटपाचा वाद संपुष्टात आला. नर्मदा काठावरील महाराष्ट्रातील गावांचा पुनर्वसन प्रश्न आणि प्रकल्प खर्च वाट्याचा मुद्दा राज्यासाठी दीर्घकाळ प्रलंबित होता. हा तंटा काँग्रेस, आघाडी आणि युती अशा वेगवेगळ्या सरकारांच्या कार्यकाळात चर्चेत राहूनही निकाली निघाला नव्हता. अखेर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना आणि केंद्रात मोदीजी सरकार असताना, देशाचे कणखर गृहमंत्री अमितजी शाह यांच्या थेट मध्यस्थीने अवघ्या एका बैठकीत हा तोडगा निघाला.

### या कराराचे महाराष्ट्राला होणारा फायदे पुढीलप्रमाणे आहेत..

▸▸सरदार सरोवर प्रकल्पाच्या रिव्हर बेड (१२०० MW) आणि कॅनाल हेड (२५० MW) या दोन्ही पॉवर हाऊसमधून निर्माण होणाऱ्या विजेत मध्य प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र यांना अनुक्रमे ५७:२७:१६ या प्रमाणात वाटा मिळतो. खर्च वाटपाचा तंटा मिटल्याने महाराष्ट्राचा हा वीजहिस्सा कोणत्याही कायदेशीर अडथळ्याविना निर्धोकपणे मिळत राहील.

▸▸नर्मदा नदी महाराष्ट्राच्या नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव-अक्राणी भागातून वाहते. या बुडित क्षेत्रातील आदिवासी गावांच्या पुनर्वसन व भरपाईचे प्रश्न वर्षानुवर्षे रेंगाळले होते. हे मुद्दे निकाली निघाल्याने स्थानिक कुटुंबांना प्रलंबित हक्काची भरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

▸▸प्रकल्प खर्च वाटपावरून अडकलेली थकीत रक्कम एकरकमी तोडग्याने निकाली निघाल्याने राज्याला या मुद्द्यावर होणारा वारंवार आर्थिक व कायदेशीर पाठपुरावा थांबेल, आणि ती आर्थिक स्पष्टता इतर सिंचन विकासकामांसाठी वापरता येईल.

▸▸या करारामुळे १० टीएमसी पाणी मिळणार आहे. आंतरराज्य वाद कायमचा मिटल्याने नर्मदा खोऱ्यातील उत्तर महाराष्ट्रासाठी भविष्यात पाणी व सिंचनविषयक नवे प्रस्ताव मांडणे, मंजूर करून घेणे अधिक सुलभ होईल जुन्या वादांचा अडसर आता उरलेला नाही.

▸▸राज्यांतर्गत असणारे पाणी वाटपाचे वाद देवेंद्रजी यांनी याधीच मिटवले आहेत. तब्बल ४७ वर्षानंतर नर्मदा पाणी वाटप वाद देखील मिटवला. याआधीही देवेंद्रजी फडणवीस यांनी तापी मेगा रिचार्ज प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र-मध्य प्रदेश दरम्यान ऐतिहासिक जलसमन्वय करार घडवून आणला होता. त्या पार्श्वभूमीवर आजचा नर्मदा करार म्हणजे राज्याच्या जलसुरक्षा धोरणातील आणखी एक महत्त्वाचे पाऊल आहे. जे केंद्र आणि राज्य समन्वयातून वर्षानुवर्षे अडकलेले प्रश्न मार्गी लागू शकतात, याचे उत्तम उदाहरण आहे. ■

# प्रदेशाध्यक्षांचा वारकऱ्यांशी संवाद



**पुणे** जिल्ह्यातील जेजुरी नगरीत संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज माऊलींच्या पालखी सोहळ्यात सहभागी होऊन भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पालखीचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी श्री. चव्हाण यांनी पालखी सोहळ्यातील भाविकांशी आणि वारकऱ्यांशी संवाद साधला. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज माऊलींच्या पालखी सोहळ्याच्या निमित्ताने आपण वर्षानुवर्षे माऊलीच्या दर्शनाला येत असतो.

माऊलींच्या अथांग ऊर्जेने भरलेल्या चरणी नतमस्तक होऊन राज्यातील मायबाप जनतेच्या सुखासाठी, समृद्धीसाठी आणि कल्याणासाठी आपण यावेळी प्रार्थना केली, अशा शब्दात श्री. चव्हाण यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी भाविकांच्या अडीअडचणी जाणून घेत त्या दूर करण्याच्या दृष्टीनेही त्यांनी संबंधितांना सूचना केल्या. यावेळी वारकऱ्यांनी आणि भाविकांनी श्री. चव्हाण यांच्याशी संपर्क साधत सरकारने दिंडीसाठी केलेल्या उपाययोजना आणि सुविधांबद्दल समाधान व्यक्त केले.

**अपघातग्रस्त वारकऱ्यांची विचारपूस**



भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी जेजुरी येथील दिंडी सोहळ्यातील अपघातग्रस्त वारकऱ्यांची विचारपूस करत त्यांना दिलासा दिला. श्री. चव्हाण यांनी हॉस्पिटलमध्ये या वारकऱ्यांची भेट घेत सरकार म्हणून अपघातग्रस्त तसेच मृत वारकऱ्यांना भाजपा सर्वतोपरी मदत करणार असल्याचे आश्वासन दिले. सरकारच्या माध्यमातून सर्व अपघातग्रस्तांना मोफत वैद्यकीय मदत उपलब्ध होत असून त्यांच्या आरोग्याची संपूर्ण काळजी घेण्याची हमी श्री. चव्हाण यांनी यावेळी दिली. ■

# किरीट सोमय्या यांच्या तपासात सापडले हजारो बेकायदा जन्म दाखले

## बांगलादेशी, पाकिस्तानी नागरिकांचा लागतोय शोध




मालेगांव येथे SIR अभियानात एकाच व्यक्तीचे नाव/फोटो अनेक ठिकाणी सापडले आहे. अदनान अली या मतदाराचे नाव ७ ठिकाणी तर सुलताना बानो यांचे नाव ५ ठिकाणी तर फराज खानचे नाव ३ ठिकाणी सापडले आहे.

● **अहिल्यानगर** महापालिकेत जुन्या नोंदीत उशिरा नावाखाली १५ हजार बेकायदेशीर जन्म प्रमाणपत्रे दिली आहेत, असे दिसून आले आहे.

● २०२५ आणि २०२६ या १६ महिन्यांत एकंदर साडे १८ हजार ७०० जुने दाखले त्यात करेक्शन करून दिले गेले आहेत. याची चौकशी करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने आणि महापालिकेने केला आहे.

● महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत चर्चेदरम्यान त्यांनी हे मान्य केले की, खोट्या पद्धतीने सुधारणेच्या नावाखाली हे दाखले दिले गेले आहेत.त्यामुळे एक अतिरिक्त व्यक्तिमत्त्व तयार झाले आहे.

● एसआयआरच्या दृष्टीने नगर जिल्ह्यात बऱ्यापैकी शिफ्टबद्ध मॅपिंग सुरू आहे.

● पावसामुळे थोडी गती कमी पडली आहे. आम्ही निवडणूक आयोगालाही विनंती केली आहे की, महाराष्ट्रात आठ दिवस पावसामुळे कामात थोडी त्रुटी निर्माण झालेली आहे, त्यासाठी मुदत वाढवून द्यावी.

● या एसआयआरच्या दरम्यान मालेगाव शहरातील एसआयआर घोटाळा बाहेर आला. तिथल्या बीएलओंनी काही दबावाअंतर्गत एकूण मतदारांपैकी ७५% मतदार योग्य आहेत, मॅपिंग झाले आहे, असा रिपोर्ट दिला.

● निवडणूक आयोगाच्या सॉफ्टवेअरने त्यापैकी ज्यांचे मॅपिंग झाले,त्यामध्ये ५२टक्के एनोमली असल्याचे आढळले.

● म्हणजे या सगळ्या मतदारांबाबत शंका आहे. या सगळ्या मतदारांची सुनावणी केली जाणार आहे.

● एकंदर २ लाख ४१ हजार ४५० मतदार मालेगावमध्ये योग्य असल्याचा रिपोर्ट दिला गेला.

● त्यापैकी निवडणूक आयोगाने १ लाख २४ हजार ४२१ मतदार संदिग्ध असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे मालेगाव हे एसआयआरसाठी बांगलादेशी मतदारांना हिंदुस्तानी बनवण्याचा अड्डा ठरत आहे.

● मुंबई महानगरपालिकेच्या जन्म नोंद विभागाचे निबंधक डॉ. दक्षा शहा यांनी आदेश क्र. ७०८४ दि. ३० जून रोजी १९ हजार ७३४ जन्म प्रमाणपत्र रद्द करण्याचे आदेश दिले आहे. मुंबई पोलीस आता या संदर्भात गुन्हा दाखल करणार आहेत. १९ हजार ७३४ लाभार्थींची



## मतदार यादीचे शुद्धीकरण ही काळाची गरज

**निवडणूक प्रक्रिया विश्वासार्ह ठेवण्यासाठी प्रत्येक बूथ प्रमुख आणि कार्यकर्त्याने सक्रिय राहण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. बीएलओ घरोघरी जाऊन पडताळणी करत आहेत. या प्रक्रियेत एकही अपात्र व्यक्तीची नोंद होणार नाही आणि एकही पात्र नागरिक वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्या, असे निर्देश सोमय्या यांनी उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधताना दिले. देशाची सुरक्षा आणि स्वच्छ प्रशासनासाठी मतदार यादीचे शुद्धीकरण ही काळाची गरज असल्याचे सांगत सोमय्या यांनी कार्यकर्त्यांना मोहीम जोमाने राबविण्याचे आवाहन केले.**

चौकशी होणार व महापालिकेच्या एक डझनहून अधिक भ्रष्ट आरोग्य अधिकारी/निबंधकांवर फौजदारी कारवाई होणार. मुंबई महानगरपालिकेने गेल्या २ वर्षांत फसवणुकीने दिलेले १९ हजार ७३४ बोगस जन्म प्रमाणपत्रे रद्द केली; बीएमसीच्या डझनभर अधिकाऱ्यांविरुद्ध लवकरच फौजदारी कारवाई सुरू होणार आहे.

वांद्रे पूर्व येथील गरीबनगर वसाहतीतील अनेक बेकायदा बांधकामे नुकतीच जमीनदोस्त करण्यात आली. अशा बेकायदा वसाहतीतील १२९६ मतदारांचे निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी मॅपिंग केल्याचे आढळून आले आहे. श्री.किरीट सोमय्या यांनी यासंदर्भात उपजिल्हाधिकारी आणि निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन गरीबनगर वसाहतीतील सर्वच्या सर्व २४१२ मतदारांची नावे मतदार यादीतून हटविण्याची मागणी केली.

मतदार पुनरिक्षण अभियान मुंबईमध्ये अजूनही पुरेशा वेगाने सुरू झाल्याचे दिसून आलेले नाही. संपूर्ण महाराष्ट्रात

## मुंब्र्यात मतदार याद्यांत ४० हजार बांगलादेशींची नावे घुसडण्याचे कारस्थान

**मतदार यादीतील बोगस आणि डुप्लिकेट नोंदी हटविण्यासाठी सुरू असलेल्या एसआयआर अभियानावरून भाजपाचे ज्येष्ठ नेते किरीट सोमय्या यांनी कल्याणमध्ये खळबळजनक गौप्यस्फोट केले. मुंब्रा परिसरात तब्बल ४० हजार बांगलादेशी नागरिकांची नावे मतदार याद्यांमध्ये घुसडण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर दावा त्यांनी केला. कल्याण पूर्वच्या आ. सुलभा गायकवाड यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित केलेल्या आढावा बैठकीत सोमय्या यांनी उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यानंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले, काही मशिदींमधून बोगस मतदारांची नावे मतदार याद्यांमध्ये समाविष्ट केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. ही फक्त यादी दुरूस्ती नाही तर लोकशाही स्वच्छ आणि पारदर्शक करण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत असल्याचे सोमय्या म्हणाले, मतदार यादीतून मृत व्यक्तींची नावे वगळणे, स्थलांतरितांच्या नोंदी काढणे आणि नवमतदारांची नोंद करणे याला मतदार यादी पुनरिक्षण अभियानामध्ये (SIR) प्राधान्य देण्यात आल्याचे सोमय्या यांनी स्पष्ट केले.**

९ कोटी ७८ लाख ५४ हजार ०४९ एवढे मतदार आहेत. यापैकी सुमारे ५५ टक्के मतदारांना फॉर्मचे वाटप झाले आहे. मतदारांकडून गोळा करण्यात आलेल्या फॉर्मचे प्रमाण १०.१७ टक्के एवढे आहे. मुंबई उपनगरात ७८ लाख ३० हजार ०११ मतदारांपैकी फक्त १३.७७ टक्के मतदारांना फॉर्मचे वाटप करण्यात आले आहे. मतदारांकडून गोळा करण्यात आलेल्या आणि डिजीटायझेशन झालेल्या अर्जांचे प्रमाण फक्त १.९८ टक्के आहे. मुंबई शहरात २५ लाख ५५ हजार ४९९ मतदारांपैकी २१.४८ टक्के मतदारांना फॉर्मचे वाटप करण्यात आले आहे. त्यापैकी ४.७७ टक्के मतदारांचे फॉर्म गोळा करण्यात आले आहेत. ■

# इथेनॉलमिश्रित पेट्रोल सुरक्षितच





**इथेनॉलमिश्रित** इंधनावरील (ई-२०) टीका फेटाळताना, 'ई-२० पेट्रोल पूर्णपणे वैज्ञानिकदृष्ट्या तपासलेले, सुरक्षित आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रमाणित इंधन आहे', असा युक्तिवाद केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूमंत्री हरदीपसिंग पुरी यांनी केला. ई-२० मुळे वाहनांच्या इंजिनांत बिघाड होत असल्याच्या वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे स्पष्टीकरण दिले. 'ई-८५ इंधनावर चालणाऱ्या वाहनांच्या आगमनानंतर इथेनॉल मिश्रित इंधनाविरुद्ध चुकीची माहिती पसरवण्याची मोहीम अधिक तीव्र झाली आहे. इथेनॉलमिश्रण कार्यक्रम मागील काँग्रेस सरकारच्या काळात सुरू झाला होता. त्यामुळे, आता त्याच्या जलद विस्ताराला होणारा विरोध राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे दिसते', असा संशय मंत्री पुरी यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये व्यक्त केला. 'भारतात एप्रिल २०२३पासून ई-१५, एप्रिल २०२४पासून ई-१९ आणि एप्रिल २०२५पासून ई-२० इंधनाचा वापर केला जात आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर वापर होऊनही कोणतीही मोठी समस्या समोर आलेली नाही. देशातील २० कोटींहून अधिक दुचाकी आणि २० लाखांहून अधिक चारचाकी वाहने ई-२० इंधनावर यशस्वीपणे धावत आहेत. मात्र,

**देशातील २० कोटींहून ६६ अधिक दुचाकी आणि २० लाखांहून अधिक चारचाकी वाहने ई-२० इंधनावर यशस्वीपणे धावत आहेत. तरीही काही विशिष्ट हेतूने वाहनांमध्ये इथेनॉल वापराला विरोध होऊ लागला आहे.**

**- हरदीपसिंग पुरी, केंद्रीय पेट्रोलियम मंत्री**

आत्ताच इथेनॉल मिश्रणाविरोधातील मोहीम अचानक तीव्र झाली आहे. ५ जून रोजी फ्लेक्स-फ्यूएल वाहनांसाठी ई-८५ इंधन सुरू झाल्यानंतर अशी टीका वाढू लागली', असा दावा पुरी यांनी केला. आयात कराव्या लागणाऱ्या कच्च्या तेलावरील भारताचे अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेने इथेनॉलसक्ती हे एक मोठे पाऊल असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. पेट्रोलमुळे 'अन्नदाता' शेतकऱ्यांना 'ऊर्जादाता' 'इथेनॉलमिश्रित बनवले आहे. कारण त्यांना उत्पन्नाचा एक अतिरिक्त स्रोत उपलब्ध झाला आहे. हा कार्यक्रम (इथेनॉलसक्ती) भू-राजकीय तणाव आणि जागतिक कच्च्या तेलाच्या किंमतीतील चढउतार यांमुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांना तोंड देण्यासाठीही देशाला अधिक सक्षम बनवणारा आहे', असे पुरी म्हणाले. ■

# पक्ष रक्षेसाठी 'रामरक्षा'



**लोकसभेतील** सहा सदस्यांनी साथ सोडल्याचा बाण उबाठांच्या चांगलाच वर्मी लागला. मुंबई महापालिका हातून गेल्यामुळे हताश झालेल्या उद्धवरावांना लोकसभा सदस्य असे गठ्ठ्याने सोडून जातील अशी अपेक्षा नव्हती. उद्या आमदार, मुंबईतले उरलेसुरले नगरसेवक जातील अशी भीती त्यांना वाटू लागली असावी. या संकटातून आपल्याला कोण वाचवेल, या चिंतेमुळे स्वतःला सर्वशक्तिमान समजणारे उद्धवराव प्रभू रामाचा धावा करू लागले आहेत. उद्धव ठाकरेंना अचानक प्रभू श्रीरामचंद्रांचे स्मरण झाले. अयोध्येतील राम मंदिरात ठेवण्यात आलेल्या दानपेटीतील रकमेच्या अपहाराची घटना उजेडात आल्याच्या पार्श्वभूमीवर उबाठांनी रामरक्षा पठणाची मोहीम सुरू करण्याचे जाहीर केले आहे. चला, यानिमित्ताने उबाठांना प्रभू श्रीरामचंद्रांचे स्मरण झाले हेही नसे थोडके. त्यांच्या गटातून शिवसेनेत जाणाऱ्यांची संख्या वाढू लागल्यामुळेच उबाठांना आपल्या गटाची रक्षा करण्याची आवश्यकता वाटू लागली असावी. त्यातूनच त्यांना प्रभू श्रीरामचंद्रांचे स्मरण झाले आहे, यात काही शंका नाही, उद्धव ठाकरेंचा स्वभाव, कार्यशैली पाहता त्यांच्या राजकारणाची शैली हेच सांगते की, आज त्यांच्या गटाची जी दुर्दशा झाली आहे त्याला उद्धव ठाकरे यांनी घेतलेले निर्णय जबाबदार आहेत. आपल्याकडे कार्यकर्ते टिकाव का धरू शकत नाहीत याचा प्रामाणिक विचार उद्धव ठाकरे कधीच करणार नाहीत.

रामरक्षा पठण करण्याची इच्छा झालीच आहे तर उद्धवरावांनी यानिमित्ताने रामायणाचे वाचन करावे, मनन करावे. त्यातून त्यांना आपल्या जीवनातील अनेक गोष्टींशी साधर्म्य असणारे प्रसंग वाचण्याची संधी मिळेल आणि त्या प्रसंगी प्रभू रामचंद्रांचे वर्तन कसे होते, आपले कसे आहे हे कळू शकेल. आपल्यावर प्रभू श्रीरामचंद्रांचा धावा करण्याची वेळ शत्रूमुळे नव्हे तर आपल्या निर्णयांमुळेच आली हे कळू शकेल. म्हणूनच उद्धवरावांच्या रामरक्षा वाचनासाठी खूप खूप शुभेच्छा. या माध्यमातून त्यांच्या तोंडी 'नामर्द', 'कोथळा', 'दगलबाज' यासारख्या शब्दांऐवजी संस्कृत शब्द येतील, त्यांची वाणीही शुद्ध होईल, अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही. प्रभू राम चंद्रांना आपल्या सावत्र मातोश्रींच्या हट्टामुळे राजसिंहासन सोडावे लागले. सिंहासन सोडताना त्यांना यत्किंचितही दुःख नव्हते. आपल्या कर्तव्याचा भाग म्हणून श्रीरामांनी सिंहासनावरील हक्क सोडला आणि अत्यंत शांतपणे १४ वर्षे वनवासासाठी प्रयाण केले. आपल्या वडिलांना दिलेले वचन पाळण्यासाठी त्यांनी कुरबूर न करता वनवास स्वीकारला. सत्ता-सिंहासनाचा मोह त्यांच्या वनवासाला जाण्याच्या निर्णयाआड आला नाही. रामायण वाचन सुरू केल्यावर उद्धवरावांना स्वतःच्या राजकारणातील प्रवेशाच्या घटनेची नक्कीच आठवण होईल. शिवसेनेच्या उभारणीच्या काळात, संघर्षाच्या काळात उद्धवराव कधीच बाळासाहेबांसोबत शिवसेनेत कार्यरत नव्हते. राज ठाकरे हे तरुणपणापासून शिवसेनेच्या कार्यात सक्रिय होते. युवक वर्गात शिवसेनेचा प्रसार करण्यासाठी सुरू केलेल्या भारतीय विद्यार्थी सेनेची धुरा राज ठाकरेंनी अनेक वर्षे यशस्वीपणे सांभाळली. राज ठाकरे रस्त्यावर उतरून शिवसेनेचे काम करीत होते, अनेक आंदोलनांत सहभागी होत होते. शिवसेनेच्या आंदोलनांमुळे त्यांच्याविरोधात अनेकदा पोलिसात तक्रारी झाल्या. त्यांचे वक्तृत्व, कार्यकर्त्यांशी संपर्क ठेवण्याची शैली यामुळे बाळासाहेबांचे राजकीय वारस म्हणून राज ठाकरेंकडेच पाहिले जात होते. असे असताना महाबळेश्वरमधील अधिवेशनात उद्धवराव अचानक शिवसेनेत सक्रिय झाले. वडिलांनी संघटना वाढीसाठी खाल्लेल्या खस्ता, केलेला संघर्ष, जमवलेले आणि विलक्षण स्नेहाने जपलेले सामान्य कार्यकर्ते आज कुठे आहेत? ■

# देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रजक समाजाच्या 50 कुटुंबांना आयर्निंग टेबल देणार

## भाजपा प्रदेश उद्योग आघाडीचा उपक्रम

**राज्याचे** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप उद्योग आघाडीच्या वतीने देवाभाऊ रजक समृद्धी योजना जाहीर करण्यात आली आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी दिलेल्या अंत्योदयाच्या शिकवणीच्या प्रेरणेतून उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर यांच्या संकल्पनेतून ही योजना तयार झाली असून पहिल्या टप्प्यात आदरणीय देवा भाऊंचा मतदारसंघ म्हणजेच नागपूर दक्षिण पश्चिम येथील ५० रजक (धोबी) समाजाच्या कुटुंबांना आयर्निंग टेबल (इस्त्री करण्याचा टेबल) देण्यात येणार आहेत. या टेबल सोबत वाफ तयार करणारी यंत्रणा असल्याने कमी श्रमांमध्ये अधिक काम सदर व्यक्ती करू शकणार आहेत. हा समाज संख्येने अत्यंत कमी व समाजातील शेवटचा घटक असल्यामुळे त्यांच्याकडे आजवर दुर्लक्ष झालेले आहे त्यासोबतच समाजाचा पारंपारिक व्यवसाय यांत्रिकीकरणाच्या काळात त्यांच्या हातून निसटत चालला आहे.

भारतीय जनता पक्ष नेहमीच तळगळातील शेवटच्या घटकापर्यंत पोचून त्यांच्या उन्नतीसाठी काम करणारा पक्ष आहे त्यामुळेच उद्योग आघाडीने सदर योजना जाहीर केली आहे. पक्षाचे उद्योजक प्रतिनिधी देवा भाऊ रजक समृद्धी योजनेअंतर्गत आपल्या नफ्याचा काही भाग दान करून हे टेबल लाभार्थ्यांना उपलब्ध करून देणार आहेत. आपणही या योजनेत सहभागी होऊन अधिकाधिक गरजूंपर्यंत योजना पोहोचण्यासाठी मदत करू शकता.

एका आयर्निंग टेबलची किंमत – ६७ हजार ५०० आहे. पक्षाचे उद्योजक प्रतिनिधी देवाभाऊ रजक समृद्धी योजनेअंतर्गत आपल्या नफ्याचा काही भाग दान करून हे टेबल लाभार्थ्यांना उपलब्ध करून देणार आहेत. आपणही या योजनेत सहभागी होऊन अधिकाधिक गरजूंपर्यंत योजना पोहोचण्यासाठी मदत करूया, असे आवाहन प्रमोद वाकोडकर यांनी केले आहे.




**भारताची सामाजिक रचना पारंपरिक कौशल्यांवर आधारित राहिली आहे. अनेक पिढ्यांपासून धोबी समाज (रजक समाज) आपल्या सेवा, निष्ठा आणि मेहनतीमुळे समाजात मानाचे स्थान मिळवत आला आहे. परंतु काळाच्या ओघात आणि यंत्रांच्या वाढत्या वापरामुळे हा पारंपरिक व्यवसाय आर्थिकदृष्ट्या मागे पडला आहे. याच पार्श्वभूमीवर, भाजपा उद्योग आघाडीने समाजहित लक्षात घेऊन मुख्यमंत्री रजक समृद्धी योजनाची व्यापक रूपरेषा तयार करण्यात आली आहे.**

### या योजनेची मुख्य उद्दिष्टे

- व्यावसायिक कौशल्यांना नवी दिशा देणे.
- उत्पन्नात वाढ करणे.
- आरोग्य व शिक्षण सुविधांमध्ये वाढ करणे.
- सर्वात महत्त्वाचे – धोबी समाजाचा आत्मसन्मान बळकट करणे.

**– प्रमोद वाकोडकर**
**अध्यक्ष, भाजपा प्रदेश उद्योग आघाडी**

# महायुती सरकारची हिंमत होती, म्हणून आम्ही कनेक्टिंग लिंक बांधली

## पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात मिसिंग लिंकवरून झालेल्या टीकेला दिले जोरदार प्रत्युत्तर

> मला तर कधी कधी आश्चर्य वाटते. काही लोक तर असे आहेत की एखादा कोटी खोटारडे लोक मेल्यानंतर ते पैदा झाले असते आणि खोटे बोलायला त्यांना लाजही वाटत नाही. कनेक्टिंग लिंक सुरू झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी टीव्हीवर येऊन खोटे बोलतात. जयंतराव, तुम्ही हसू नका. मी तुम्हाला नक्की सांगतो, पण एक कोटी खोटारडे मेल्याशिवाय हे पैदा होऊच शकत नाहीत. खरे म्हणजे, कनेक्टिंग लिंकचे काय झाले? तर आपण सगळ्यांनी बघितले, खोटारडेपणा सगळा बाहेर आला. पण महायुती सरकारची हिंमत होती, म्हणून आम्ही कनेक्टिंग लिंक बांधून टाकली.

**ज्यावेळी** कोकण रेल्वे बांधायची वेळ आली, त्यावेळीही लोक म्हणायचे, ही रेल्वे चालू शकणार नाही. हे बांधू नका. इथे दरड कोसळते. पण मधू दंडवते नावाच्या एका व्यक्तीमध्ये हिंमत होती. त्यांनी सांगितले, बांधणार, आणि ती बांधली. बांधल्यानंतर जवळपास १५ वर्षे दरवर्षी दरड कोसळायची. पण त्या प्रत्येक वर्षी आपण शिकायचो



आणि त्या ठिकाणी काही ना काही काम करायचो, आणि तेथील दरड कोसळणे बंद करायचो. आज विचार करा, या भीतीने जर कोकण रेल्वे तयारच केली नसती, तर काय अवस्था राहिली असती? म्हणून ही जी मिसिंग लिंक आहे, तिचा इतिहास असाच आहे. त्यावेळी मागचे आघाडीचं सरकार होतं. त्या आघाडीच्या सरकारमध्ये या मिसिंग लिंकच्या संदर्भातला प्रस्ताव तयार झाला होता. त्या सरकारच्या माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दोन पानांची नोट लिहून १४ कारणे सांगितली आणि ही मिसिंग लिंक करता येणार नाही, अशा पद्धतीने फाईल बंद केली.

**पण लक्षात ठेवा –**
**गिरते हैं शेर-सवार ही मैदान-ए-जंग में,**
**वो क्या गिरेंगे जो घुटनों के बल चले.**

आम्ही निर्णय केला. अधिकाऱ्यांशी बोललो, एक्सपर्टशी

बोललो. त्यांचे म्हणणे होते, हे शक्य आहे. हे आपण करू शकतो. आणि आपण ते करून दाखवले. कनेक्टिंग लिंक तयार झाली. ही नुसती लिंक नाही; इंजिनिअरिंगचं एक मार्व्हल तयार झाले. जगातला सगळ्यात मोठा, सगळ्यात रुंद बोगदा; भारतातला सगळ्यात उंच व्हायाडक्ट; आणि सगळ्यात उंच केबल-स्टेड ब्रिज आपण त्या ठिकाणी तयार करून दाखवला. जिथे १७० किलोमीटर प्रति तास वेगाने वारा येतो, त्या ठिकाणी आपण ही मिसिंग लिंक, म्हणजेच कनेक्टिंग लिंक, तयार केली. मला त्या सगळ्या इंजिनिअर्सचे, कॉन्ट्रॅक्टर्सचे आणि अधिकाऱ्यांचे अतिशय कौतुक करायचे आहे, ज्यांनी हे इंजिनिअरिंग मार्व्हल तयार करून दाखवले. आज त्या एका कनेक्टिंग लिंकमुळे संपूर्ण घाट सेक्शनमधले अपघात संपले. घाट सेक्शनचा ट्रॅफिक संपला.

आज आपण पाहू शकतो की घडले काय तर वरून दरड कोसळली. ती कमानीवर पडली. त्या कमानीचा भाग तुटला आणि दरड खाली पडून त्या ठिकाणी मलबा तयार झाला. कुठेही केबल-स्टेड ब्रिजला क्रॅक नाही. कुठल्याही बोगद्याला अडचण नाही. उलट, लोकांनी सांगितले की बोगद्यात इमर्जन्सीचे बटण दाबल्याबरोबर तीन मिनिटांत क्रेन आमच्याकडे आली. अनेकांनी सांगितले, बोगदा होता, म्हणून आम्ही त्या ठिकाणी वाचलो. पण लगेच पाणी पडतेय असे व्हिज्युअल दाखवणे सुरू केले, जसे काही कनेक्टिंग लिंकच तुटली. काही लोक... त्यांना तोंडखुरी आहे. आमच्या विदर्भातला शब्द आहे. ते असे सुरू पडले की जणू काही सात हजार कोटी पाण्यात गेले. जयंतराव, १८ तासांमध्ये ट्रॅफिक सुरू झाला, यांच्या थोबाडावर टिच्चून. सवाल हा नाहीये. अरे, देवेंद्र फडणवीसला शिव्या द्या; त्याला त्याची सवय आहे. मलाही सवय आहे. मी शिव्या-प्रूफ आहे. कारण जीवनात एकच गोष्ट शिकलो आजपासून दहा वर्षांनी हे शिव्या देणारे दिसणार नाहीत, पण ती कनेक्टिंग लिंक असेल आणि देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांचेच नाव असेल. पण माझा आक्षेप या गोष्टीला आहे. मला बदनाम करा, पण महाराष्ट्राला बदनाम करू नका. आमच्या जयंतरावजींनी योग्य गोष्ट सांगितली. आजकाल सोशल मीडियावर येऊन काही लोक सगळ्यांनाच शिवीगाळ करतात. मुख्यमंत्र्यांनाही शिवीगाळ करतात. असे हे भाड्याचे तट्टू या मिसिंग लिंकबाबतही पैसे घेऊन सोशल मीडियावर लिहित होते. त्यांनाही मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्राचा अपमान कराल, तर सोडणार नाही.

अध्यक्ष महोदय, या घटनेने देखील आपल्याला काही गोष्टी शिकवल्या. पाण्याचा प्रवाह कसा बदलू शकतो, दरड कशी कोसळू शकते, हे आपण पाहिले. म्हणून पुन्हा आयआयटीच्या तज्ज्ञांशी आपण चर्चा केली. त्यांनी आपल्याला सांगितले की, अजून काही ठिकाणी वायर मेश लावली पाहिजे. कुठून दरड कोसळू शकते, याचा नवीन आराखडा त्यांनी दिलेला आहे. तोही आपण राबवू. म्हणजे पुढच्या वेळी कदाचित अशा प्रकारची घटना होणार नाही.

आपण पाहिले तर मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू आहे. आणि काही लोक तर मला समजतच नाही, कुठून काय खाऊन येतात! एक जण असे म्हणाले की, आमचे आंदोलन होते म्हणून मुख्यमंत्र्यांनी सांगितले की नाशिकमध्ये पाऊस पडणार आहे. जाऊ द्या. नानाभाऊ, तुमच्यासारखी चांगली माणसे बाजूला झाली की काय होते? पण नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू आहे. त्र्यंबकेश्वरलाही २५२ मिमी पाऊस पडला आहे. पण सगळ्यात गंभीर परिस्थिती विशेषतः वसई-विरारमध्ये दिसत आहे. जवळपास १ जुलैपासून रोज १०० मिमीपेक्षा जास्त पाऊस त्या ठिकाणी पडत आहे. त्यात ६ जुलैला ३२५ मिमी, ७ जुलैला २०२ मिमी, आणि जवळपास ७२ तासांत ६७२ मिमी इतका पाऊस त्या ठिकाणी पडला आहे. तिथे एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या दोन्ही कंपन्या तैनात करण्यात आलेल्या आहेत. सर्व मोबाईल कंपन्यांशी चर्चा करण्यात आली आहे, कारण तिथे मोबाईल नेटवर्क बंद पडले आहे. मोबाईल कंपन्यांचे इन्फ्रास्ट्रक्चर नुकसानग्रस्त झाले आहे. तेही पूर्ववत करण्याचे काम सुरू आहे. विशेषतः वीज वितरणाचे इन्फ्रास्ट्रक्चर मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झाले आहे. त्यामुळे काही भागांमध्ये जाणीवपूर्वक वीजपुरवठा बंद ठेवावा लागला आहे. तो आपण लवकरात लवकर पूर्ववत करण्याचा प्रयत्न करत आहोत. काही भागांमध्ये आपत्कालीन स्वरूपाची कामे करावी लागणार आहेत. ती कामे देखील सुरू करण्यात आलेली आहेत. कोकण विभागातील विशेषतः प्रभावित जिल्ह्यांमध्ये तातडीने जिल्हाधिकाऱ्यांना निधी देण्यात आला आहे. ■

# आषाढी वारीसाठी मानाच्या १,४०० दिंड्यांना प्रत्येकी २० हजारांचे अनुदान



**आषाढी** एकादशी वारीसाठी मानाच्या पालख्यांसोबत पंढरपूरला जाणाऱ्या १,४०० दिंड्यांना प्रत्येकी २० हजार रुपये इतके अनुदान वितरित करण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली असून, यासाठी २ कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला असल्याची माहिती राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांनी दिली. राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले की, वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक समतेची ओळख आहे. लाखो वारकरी दरवर्षी पंढरपूरच्या वारीत सहभागी होत असतात. वारकऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने २०२४ मध्ये मुख्यमंत्री वारकरी महामंडळ स्थापन केले असून, त्यामार्फत सलग तिसऱ्या वर्षी मानाच्या दिंड्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. यावर्षी आषाढी एकादशी वारीसाठी मानाच्या दहा पालख्यांसोबत सहभागी होणाऱ्या १,४०० दिंड्यांना प्रत्येकी २० हजार रुपये या प्रमाणे अनुदान वितरित करण्यात येणार आहे. या योजनेसाठी आवश्यक असलेला २ कोटी ८० लाख रुपयांचा निधी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात आला आहे. या अनुदानाचे वितरण मुख्यमंत्री वारकरी महामंडळामार्फत करण्यात येणार असून, त्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे आवश्यक प्रशासकीय जबाबदारी सोपविण्यात आली आहे. राज्य शासन वारकरी संप्रदायाच्या परंपरेचे जतन, संवर्धन आणि वारकऱ्यांच्या कल्याणासाठी कटिबद्ध आहे. त्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने अनुदान देण्यात येत आहे. ■

# समान नागरी कायद्याच्या मसुद्यासाठी समिती

## मुख्यमंत्र्यांची घोषणा



**राज्यात** समान नागरी कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत केली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारताच्या संविधानातील राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रत्येक राज्याने समान नागरी कायद्याचा विचार करावा, असे निर्देश आहेत. त्यानुसार २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी समिती स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्या अनुषंगाने राज्य शासनामार्फत या समितीची स्थापना करण्यात येत आहे.

समितीमध्ये न्यायमूर्ती रंजना देसाई (माजी न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय), न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण (माजी न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय), न्यायमूर्ती एस. जी. मेहरे (माजी न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय), डी. के. जैन (माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य), ॲड. वीरेंद्र सराफ (माजी महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य), रमेश पतंगे (पद्मश्री व संविधान अभ्यासक) आणि सुवर्णा रावल (शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या) यांचा समावेश आहे. ही समिती पुढील सहा महिन्यांत आपला अहवाल राज्य शासनाला सादर करेल. या अहवालाच्या आधारे येत्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायद्याचे विधेयक विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्याचा शासनाचा प्रयत्न राहील. ■

# शेतीकामासाठी गाळ, मुरूमावरील रॉयल्टी रद्द!

**बळीराजाला** आता स्वतःच्या शेती सुधारणेसाठी, विहीर, गोठा किंवा शेतघर बांधण्यासाठी लागणाऱ्या माती आणि मुरूमासारख्या गौण खनिजांसाठी शासनाला एक रुपयाचीही रॉयल्टी (स्वामित्व धन) द्यावी लागणार नाही. इतकेच नव्हे, तर शेतकऱ्यांच्या मालकीचे ट्रॅक्टर किंवा बैलगाड्या अडवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणाऱ्या पोलीस किंवा महसूल अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत केली.

जलसंपदा आणि मृद व जलसंधारण विभागाच्या अखत्यारीतील जलकुंभ, गावतळी, शेततळी, पाझर तलाव, गाव नाले, महसुली नाले, बंधारे, मालगुजारी तलाव, लघुसिंचन तलाव किंवा स्वतःच्या शेतातून गाळ, माती व मुरूम काढण्यास आता पूर्ण मुभा असेल. पावसाळ्यात शेतात आणि शेतरस्त्यांवर होणारा चिखल दूर करणे, खड्डे भरणे, विहीर खणणे, जनावरांचा गोठा बांधणे आणि शेतघर दुरुस्तीसाठी या गौण खनिजाचा थेट वापर करता येईल.

शेतकऱ्यांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत म्हणून प्रक्रियेचे सुलभीकरण करण्यात आले आहे. शेतकऱ्याला केवळ स्थानिक तलाठ्याकडे एक साधा अर्ज करावा लागेल. संबंधित मंडळ अधिकाऱ्याने अर्जावर १५ दिवसांच्या आत परवानगी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. तलाव किंवा नाले जलसंधारण विभागाचे असतील तर त्या विभागाचे आणि महसुली नाले असल्यास तहसीलदारांचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल. शेतकऱ्यांनी स्वतःच्या वापरासाठी माती-मुरूम नेल्यास ट्रॅक्टर, ट्रक किंवा बैलगाडी कुठलेही तहसीलदार किंवा पोलीस पकडणार नाहीत. त्यांच्यावर कोणतीही दंडात्मक कारवाई केली जाणार नाही. जर कोणत्याही अधिकाऱ्याने शेतकऱ्याला नाहक त्रास दिला, तर सरकार त्यांच्यावर कठोर पावले उचलेल, हा निर्णय केवळ आणि केवळ शेतकऱ्यांच्या वैयक्तिक व शेतीकामाच्या कल्याणासाठी घेण्यात आला आहे. या सवलतीचा कोणताही व्यावसायिक गैरवापर करता येणार नाही. ■

# नोंदणीकृत बांधकाम कामगारांना सुधारित कल्याणकारी योजना लागू

**राज्य** शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्यावतीने राज्यातील लाखो नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. कामगारांचे आर्थिक उत्पन्न वाढवणे, त्यांच्या सामाजिक सुरक्षेला प्राधान्य देणे आणि त्यांच्या कुटुंबातील पुढील पिढीला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे या उद्देशाने मंडळाच्या ४ प्रमुख कल्याणकारी योजनांमध्ये सामाजिक सुरक्षा संहिता २०२० नुसार महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. सुधारित तरतुदींनुसार कामगारांना मिळणाऱ्या लाभ रकमेत वाढ करण्यात आली आहे, अशी माहिती कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिली आहे. नोंदणीकृत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाला, तर त्याच्या कुटुंबाला आधार म्हणून दिली जाणारी एकवेळची आर्थिक मदतीची रक्कम आता ३ लाख ५० हजार रुपये करण्यात आली आहे. कामगाराचा अपघाती दुर्दैवी मृत्यू झाल्यास, त्याच्या कुटुंबाची आर्थिक वाताहत रोखण्यासाठी अपघाती मृत्यू सहाय्य म्हणून एकवेळ तब्बल ६ लाख ५० हजार रुपयांचे भरीव आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. याशिवाय, जर एखाद्या कामगाराला अपघातामुळे किंवा अन्य कारणांमुळे कायमचे अपंगत्व आल्यास एकवेळचे दिव्यांग सहाय्य म्हणून २ लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे.

### निवृत्तीवेतन योजनेचा लाभ

बांधकाम कामगारांच्या वृद्धत्वाचा काळ सुकर व्हावा, यासाठी मंडळाकडे नोंदणीकृत कामगारांकरिता निवृत्तीवेतन योजनेत महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. वयाची ६० वर्षे पूर्ण केलेल्या व मंडळाकडे सलग किमान १० वर्षे पूर्ण नोंदीत असलेल्या बांधकाम कामगारांना निवृत्तीवेतन देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ कामगारांच्या मंडळाकडील एकूण नोंदणी कालावधीशी जोडण्यात आला आहे. त्यानुसार, ज्या कामगारांचा नोंदणी कालावधी झाला आहे, त्यांना ५० टक्क्यांच्या मर्यादेत म्हणजेच प्रतिवर्ष ६ हजार रुपये निवृत्तीवेतन दिले जाईल. ■

# दशावतारासह लोककला अनुदान दुप्पट

## कलाकारांच्या खात्यावर थेट अनुदान जमा होणार



**राज्यातील** दशावतार ही केवळ लोककला नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि पारंपरिक वारशाचा अविभाज्य भाग आहे. या कलेचे जतन व संवर्धन करण्यासाठी दशावतारासह लोककला अनुदानाची रक्कम २ कोटी २२ लाख रुपयांवरून ४ कोटी ४० लाख रुपयांपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला असून कलाकारांना थेट त्यांच्या बँक खात्यात अनुदान जमा करण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत केली.

कोकणातील दशावतार कलेने राज्यासह देश-विदेशात महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख निर्माण केली आहे. या कलेसाठी कार्यरत असलेल्या कलाकारांच्या विविध मागण्यांबाबत बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीत राज्यस्तरीय समितीचा विस्तार करण्यात आला असून देवेंद्र नाईक, दत्ताप्रसाद शेणई, संतोष रेडकर, राजाराम धुरी आणि शरद मोचेमाडकर यांचा समितीत समावेश करण्यात आला आहे.

१ जानेवारी २००८ च्या शासन निर्णयानुसार पूर्णवेळ तमाशा, हंगामी तमाशा, दशावतार, खडी गंमत तसेच शाहिरी व संगीत बारी या लोककलांना भांडवली व प्रयोगात्मक अनुदान दिले जाते. मात्र अनुदानाचा लाभ कलाकारांपर्यंत थेट पोहोचावा, यासाठी नव्या निर्णयानुसार वाढीव निधीपैकी निम्मी रक्कम कलाकारांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल, तर उर्वरित रक्कम कलापथक चालकांना देण्यात येईल. यासंदर्भातील शासन निर्णय पुढील १५ दिवसांत निर्गमित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दशावतार कलाकारांची नोंदणी, जिल्हास्तरावर प्रत्यक्ष पडताळणी तसेच लोककलावंतांना ओळखपत्र देण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. यासाठी विभागीय अधिकारी जिल्हास्तरावर जाऊन नोंदणी प्रक्रिया राबवतील, असे त्यांनी सांगितले. दशावतार महोत्सव, नमन महोत्सव तसेच राज्य सांस्कृतिक पुरस्कार योजनेंतर्गत दशावतार कलेसाठी तीन लाख रुपयांचा राज्य सांस्कृतिक पुरस्कार आणि एक लाख रुपयांचा राज्य सांस्कृतिक युवा पुरस्कार देण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली. राज्यातील भारूड, शंकासूर आणि शक्तीतुरा या लोककलांचे महोत्सव राज्यातील प्रत्येक विभागात आयोजित करण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. तसेच कोकणासह राज्यातील भजनी मंडळांना भांडवली साहित्य खरेदीसाठी सुरू असलेली अनुदान योजना अधिक व्यापक करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### देवखेळेवर कारवाई

'देव खेळ' या वेब सिरीजमध्ये लोकपरंपरेचा विपर्यास झाल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल घेऊन संबंधित वेब सिरीजविरोधात पोलिस कारवाई करण्याचे तसेच केंद्र शासनालाही याबाबत कळविण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती मंत्री ॲड. शेलार यांनी दिली. याशिवाय, राजर्षी शाहू महाराज वृद्ध कलाकार मानधन योजनेत पात्र दशावतार कलाकारांचा समावेश करण्यासाठी जिल्हास्तरीय समित्यांमार्फत कार्यवाही करण्यात येईल. भजनी कलाकारांच्या विविध मागण्यांबाबत स्वतंत्र बैठक घेऊन निर्णय करण्यात येईल, असेही मंत्री श्री. शेलार यांनी सांगितले. ■

# भारतात पहिली 'हायड्रोजन रेल्वे' सुरू!



**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी देशातील पहिल्या हायड्रोजन रेल्वेला हिरवा झेंडा दाखवला. जिंद ते सोनीपत. ८९ किलोमीटरचा हरियाणातला हा रेल्वेमार्ग जगाच्या नकाशावर भारताची नवी ओळख करून देणार आहे. भारताची पहिली हायड्रोजनवर चालणारी प्रवासी रेल्वे या मार्गावर सुरू झाली आहे. हायड्रोजन फ्युएल सेलवर चालणारी ही ऐतिहासिक रेल्वे भारताची नवी ओळख बनणार आहे. १० डब्यांच्या, ७५ किमी प्रतितास वेगाने चालणाऱ्या या रेल्वेत असणाऱ्या हायड्रोजन फ्युएल सेलमध्ये हायड्रोजन आणि हवेतल्या ऑक्सिजनची रिक्शन होऊन वीज तयार होते. ती वीज इलेक्ट्रिक मोटर चालवते. आणि चालताना धूर किंवा कार्बन डायऑक्साइड न सोडता तर फक्त पाण्याची वाफ एक्झॉस्ट म्हणून बाहेर सोडणार आहे. त्यामुळे ही रेल्वे पूर्णपणे पर्यावरणपूरक आहे. यातले सगळे तंत्रज्ञान स्वदेशी असून जींदमध्ये यासाठी इंधन म्हणून लागणाऱ्या हायड्रोजनची निर्मिती आणि इंधन भरण्याची सुविधा उभी करण्यात आली आहे.

१६ एप्रिल १८५३ ला भारतात सुरू झालेला हा रेल्वेचा प्रवास अखंड सुरू आहे. बोरीबंदर ते ठाणे दरम्यान धावलेली पहिली रेल्वे कोळशावर चालणाऱ्या वाफेच्या इंजिनाची होती. पुढे १९२५ ला विजेवर धावणारी, १९५० च्या दशकात डिझेलवर धावणारी आणि नंतर अलीकडच्या दशकात झपाट्याने झालेले विद्युतीकरण अशी रेल्वेची स्थित्यंतरे आपण बघितली. आता हायड्रोजनवर चालणाऱ्या रेल्वेचे नवीन युग सुरू झाले आहे. जर्मनी आणि चीननंतर हायड्रोजनवरची व्यावसायिक रेल्वे सुरू करणारा आपला भारत हा जगातील तिसराच देश ठरला आहे. अमेरिका आणि जपान अजून प्रायोगिक अवस्थेतच आहेत. वाफेवर चालणाऱ्या रेल्वे पासून सुरू झालेला हा प्रवास आज एक्झॉस्ट म्हणून वाफ सोडण्यापर्यंत येताना तंत्र कदाचित बदलले असेल, पण प्रवाशांच्या सुखरूप सेवेचा मंत्र अजूनही तोच आहे. एकाचवेळी सुमारे २,६०० प्रवासी यातून प्रवास करू शकणार आहेत. जागतिक स्तरावर बहुतेक हायड्रोजन रेल्वे २ ते ४ डब्यांच्याच असतात, त्यामुळे भारताची ही १० डब्यांची रेल्वे ही जगातील सर्वात मोठ्या हायड्रोजन रेल्वेपैकी एक ठरली आहे. ही रेल्वे चालवण्यासाठी वरून जाणाऱ्या विजेच्या तारांची किंवा डिझेल इंजिनची गरज पडत नाही. रेल्वेच्या 'ड्रायव्हिंग पॉवर कार'मध्ये हायड्रोजनचे सिलिंडर्स बसवले आहेत. यातील हायड्रोजनचा हवेतील ऑक्सिजनसोबत रासायनिक संयोग घडवून आणला जातो. या रासायनिक प्रक्रियेतून थेट वीज तयार होते, ज्यावर रेल्वेचे ट्रॅक्शन मोटर्स चालतात. या प्रक्रियेत इंधन जळत नसल्यामुळे कोणताही धूर किंवा कार्बनचे उत्सर्जन होत नाही. रेल्वेमधून बाहेर पडणारा एकमेव घटक म्हणजे 'पाण्याची वाफ' आणि उष्णता! यामुळे ही पूर्णपणे 'झिरो-इमिशन' रेल्वे आहे. ■




प्रभारी आ.भगवानदास सबनानी यांच्या प्रमुख उपस्थितीत एसआयआरबाबत बैठक- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, प्रदेश सरचिटणीस आ. योगेश सागर, प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे, प्रदेश सरचिटणीस आ. संजय कुटे, प्रदेश सरचिटणीस आ. माधवी नाईक, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, प्रदेश सरचिटणीस सुनील राणे आदी.



हातकणंगले (जि. कोल्हापूर)- एसआयआरबाबत बैठक- उपस्थिती- माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे, भाजपा कोल्हापूर (पूर्व) जिल्हा प्रभारी रामकृष्ण वेताळ, भाजपा कोल्हापूर (पूर्व) जिल्हाध्यक्ष राजवर्धन नाईक-निंबाळकर आदी.




लातूर- बूथ सशक्तीकरण बैठक- उपस्थिती- ज्येष्ठ नेते नितीन काळे, युवा मोर्चा ग्रामीण जिल्हाध्यक्ष ऋषिकेश कराड, महेंद्र गोडभाले, प्रताप पाटील, उद्धव काळे, शरद दरेकर, पद्माकर चिंचोलकर आदी.




पिंपरी विधानसभा– एसआयआरबाबत बैठक– उपस्थिती– एसआयआर अभियान प्रदेश संयोजक किरीट सोमय्या, आ. अमित गोरखे, आ. उमा खापरे, ज्येष्ठ नेते भरत पाटील, पिंपरी–चिंचवड जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न काटे, उपमहापौर शर्मिला बाबर आदी.





उत्तर मुंबई– एसआयआरबाबत बैठक– उपस्थिती– मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, प्रदेश सरचिटणीस आ. योगेश सागर, आ. अतुल भातखळकर, आ. प्रवीण दरेकर, आ.संजय उपाध्याय, आ. मनिषा चौधरी, मुंबई सरचिटणीस विनोद शेलार, उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष दीपक तावडे, निखिल व्यास, सभागृह नेते गणेश खणकर, नगरसेवक प्रकाश दरेकर आदी.



कोल्हापूर उत्तर– कसबा बावडा येथे मतदारांना फॉर्म वाटप– उपस्थिती– एसआयआर पश्चिम महाराष्ट्र संयोजक विक्रम पावसकर, धीरज पाटील, संजय जासूद, प्रशांत जामदार, वेदार्थ राजवर्धन, विराज चिखलीकर, अनिता अधिक, धीरज पाटील, सुनील कासार आदी.




माहिम- बूथ लेव्हल एजंट- २ संमेलन- उपस्थिती- सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, मुंबई सरटिचणीस श्वेता परूळकर, नगरसेवक प्रतिक कर्पे, जितेंद्र राऊत, दक्षिण मध्य मुंबई जिल्हाध्यक्ष नीरज उभारे, जिल्हा सरचिटणीस अक्षता तेंडुलकर आदी.



कराड- आ. डॉ. अतुल भोसले यांनी कुटुंबातील सर्व सदस्यांची मतदार यादी पडताळणी व SIR प्रक्रिया बीएलओ यांच्या माध्यमातून पूर्ण केली.




नाशिक- एसआयआर शिबिर- उपस्थिती- प्रशांत जाधव, गिरीश पालवे, अभय छल्लाणी, नंदकुमार देसाई, सुनील गायकवाड, संजय शिंदे, प्रदीप पाटील आदी.



ठाणे- मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेच्या अनुषंगाने कोपरी पाचपाखाडी विधानसभा क्षेत्र बैठक- उपस्थिती- प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे, जिल्हाध्यक्ष संदीप लेले, नगरसेवक भरत चव्हाण, नगरसेवक अमित सरैया, शहर सरचिटणीस डॉ. समीरा भारती, सरचिटणीस विक्रम भोईर आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**

**कार्यालय मंत्री :**

भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com